१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

**रायगड** सोमवार । दि. २१ सप्टेंबर २०२६ । अंक १०६ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## १४ फुटांपेक्षा उंच झोपड्यांवर कारवाई!

**मुंबई :** मुंबईतील झोपडपट्टी परिसरातील १४ फूट किंवा त्यापेक्षा अधिक उंचीच्या अनधिकृत बांधकामांवर महापालिकेकडून कारवाई करण्यात येणार आहे. १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येणार असून, संबंधित रहिवाशांनी अनधिकृत बांधकामे स्वतःहून हटवावीत, अन्यथा कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा बीएमसीने दिला आहे. मुंबई शहर व उपनगरात एकूण २ लाख २३ हजार १५० झोपड्या असून, त्यापैकी ३९ हजार १११ झोपड्या १४ फूट किंवा त्यापेक्षा अधिक उंचीच्या असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

## देवभूमीवर पुन्हा नवं संकट

**नवी दिल्ली :** उत्तराखंडमधील भारतीय मध्य हिमालयातील २३ प्रमुख हिमनद्या वेगाने मागे सरकत असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिओलॉजी आणि यूपीईएसच्या संशोधकांनी केलेल्या अभ्यासानुसार, १९९० ते २०२४ या काळात या हिमनद्यांमधून एकूण २५.६ किलोमीटर बर्फ नाहीसा झाला आहे. उपग्रह प्रतिमा, क्षेत्रीय सर्वेक्षण आणि विविध वैज्ञानिक अभ्यासांच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. पिंडारी, मिलम, गंगोत्री, चोराबाडी आणि भागीरथी यांसह अनेक हिमनद्या सातत्याने आक्रसत असल्याने मोठे संकट उभे ठाकले आहे.

## निगडोलीतील धक्कादायक घटना

# जमिनीच्या वादातून नात्याचा अंत!

संतोषी म्हात्रे

**। खोपोली ।**

**जमिनीच्या वाटणीच्या वादातून बहिण रोहिणी भगवान पाटील आणि दीपक पांडुरंग पाटील यांनी ५५ वर्षीय लक्ष्मण पांडू डुकरे यांना मारहाण केल्याचा आरोप असून, या मारहाणीत लक्ष्मण यांचा मृत्यू झाला. शनिवारी (दि. १९) निगडोली येथे घडलेल्या या घटनेने खालापूर तालुक्यात खळबळ उडाली आहे. घटनेनंतर खालापूर पोलिसांनी आरोपी रोहिणी पाटील आणि दीपक पाटील यांना ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लक्ष्मण डुकरे आणि त्यांची बहीण रोहिणी यांच्यात काही दिवसांपासून जमिनीच्या वाटणीवरून वाद सुरू होता. मे महिन्यातही याच कारणावरून दोघांमध्ये बाचाबाची आणि मारामारी झाली होती. शनिवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास रोहिणी पाटील आणि दीपक पाटील हे लक्ष्मण यांच्या निगडोली येथील शेतघरावर आले. यावेळी पुन्हा जमिनीच्या वाटणीवरून वाद झाला आणि त्याचे रूपांतर मारामारीत झाले. रोहिणी आणि दीपक यांनी लक्ष्मण यांना मारहाण केल्याचा आरोप आहे. वडिलांना वाचवण्यासाठी त्यांचा मुलगा जयेंद्र मध्ये पडला



● मयत लक्ष्मण डुकरे

### जमीन सोन्याची; नाती मात्र रक्ताची!

महामार्ग, औद्योगिक प्रकल्प आणि फार्महाऊसच्या वाढत्या मागणीमुळे ग्रामीण भागातील जमिनींचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. त्यामुळे पूर्वी उपजीविकेचे साधन असलेली जमीन आता मोठ्या आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू बनली आहे. मात्र, जमिनीच्या वाटणीसाठी रक्ताच्या नात्यातच संघर्ष पेटून त्याचा शेवट जीवावर बेतत असेल, तर वाढत्या जमिनीच्या किमतींसोबत नात्यांची किंमतही तपासण्याची वेळ आली आहे.

### दीपक पाटील कोण?

बहीण-भावाच्या जमिनीच्या वादात दीपक पाटील याचा नेमका संबंध काय? निगडोलीतील लक्ष्मण डुकरे यांच्या मृत्यूच्या प्रकरणात त्यांची बहीण रोहिणी भगवान पाटील यांच्यासह दीपक पांडुरंग पाटील यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मात्र, बहीण आणि भावामधील जमिनीच्या वाटणीच्या वादात दीपक पाटील याचा नेमका संबंध काय होता, तो घटनास्थळी का आला होता आणि मारहाणीमध्ये त्याची नेमकी भूमिका काय होती, याबाबतची अधिकृत माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे.

- **बहिणी आणि तिच्या साथीदाराकडून भावाला मारहाण**
- **मारहाणीत ५५ वर्षीय लक्ष्मण डुकरे यांचा मृत्यू**
- **आरोपींना पोलिसांनी ठोकल्या बेड्या**

असता त्यालाही मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. मारहाणीत लक्ष्मण यांना गंभीर दुखापत झाली आणि ते जमिनीवर कोसळले. त्यांना तातडीने चौक येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच खालापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी चौक ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. खालापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. जयेंद्र डुकरे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, रोहिणी ●➤पान २ वर

## वेधक

### बीएमडब्ल्यू कारच्या अपघातात तीन ठार

**मुंबई :** मुंबईतील कोस्टल रोडवर रविवारी भल्या पहाटे एक भीषण अपघात घडला. मरीन ड्राईव्हकडून हाजी अलीच्या दिशेने जाणाऱ्या एका भरधाव काळ्या रंगाच्या बीएमडब्ल्यू कारचा लाला कॉलेजसमोर, लोटस जेट्टीजवळ अपघात झाला. अतिवेगामुळे चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला असून, एकाची प्रकृती चिंताजनक आहे. कोस्टल रोड नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या माहितीनुसार, ●➤पान २ वर

### रशियावर युक्रेनचा पुन्हा ड्रोन हल्ला

**नवी दिल्ली :** गेल्या काही वर्षांपासून रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध सुरू आहे. दोन्ही देश एकमेकांच्या शहरांवर हल्ले करत आहेत. या दोन्ही देशातील संघर्ष अद्याप संपलेला नाही. अशात आता पुन्हा युक्रेननं रशियावर १००० हून अधिक ड्रोन्सने हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळं मोठी खळबळ उडाली आहे. अधिकाऱ्यांनी रविवारी (२० सप्टेंबर) दिलेल्या माहितीनुसार, युक्रेनच्या सैन्यानं रात्रीच्या वेळी रशियावर १००० हून अधिक ड्रोन्स डागले. आतापर्यंतचा हा सर्वात मोठा हल्ला आहे.

### विजेचा धक्क्यात दोघांचा मृत्यू

**मुंबई :** लालबाग-काळाचौकी परिसरात गणेशोत्सवाच्या निमित्ताने हजारो भाविकांची अलोट गर्दी उसळलेली असतानाच रविवारी पहाटेच्या सुमारास एक दुर्दैवी घटना घडली. काळाचौकी येथील 'महागणपती उत्सव मंडळ' परिसरात पिण्याच्या पाण्याच्या तात्पुरत्या स्टॉलवर अचानक विद्युत प्रवाह उतरला. यावेळी पाणी पिण्यासाठी आलेल्या आठ वर्षांच्या चिमुकलीसह ३३ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला असून, अन्य चार जण जखमी झाले आहेत.

### निला विखे पाटील स्वीडनच्या खासदार

**मुंबई :** अहिल्यानगरशी घट्ट नाते असलेल्या विखे पाटील कुटुंबाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. निला विखे पाटील यांची स्वीडनच्या संसदेत खासदार म्हणून निवड झाली आहे. ग्रीन पार्टीच्या नेत्या असलेल्या निला यांनी स्टॉकहोम सिटी मतदारसंघातून विजय मिळवला. निला या डॉ. अशोक विखे पाटील यांच्या कन्या, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पणती, दिवंगत बाळासाहेब विखे पाटील यांच्या नात आणि मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या पुतणी आहेत.

# परतीच्या प्रवासात कोंडी

## मुंबई-गोवा महामार्गावर वाहनांच्या ५ ते ६ किलोमीटरपर्यंत रांगा

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाचा उत्साह आणि पाच दिवसांच्या बाप्पाला निरोप दिल्यानंतर आता कोकणवासियांचा मुंबईकडे परतीचा प्रवास सुरू झाला आहे. रायगड जिल्ह्यातील विविध एसटी स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळत असून, मुंबई आणि पनवेलच्या दिशेनं जाणाऱ्या एसटी बससाठी प्रवाशांच्या मोठ्या रांगा लागल्या आहेत. दुसरीकडे, खासगी वाहनांची संख्याही वाढल्यानं मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.

गणेशोत्सवासाठी कोकणात गेलेल्या गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासाला वाहतूक कोंडीचं विघ्न आलं आहे. मुंबईच्या दिशेनं जाणाऱ्या मार्गावर माणगाव आणि इंदापूर येथे मोठी वाहतूक कोंडी झाली असून, वाहनांच्या ५ ते ६ किलोमीटरपर्यंत रांगा लागल्या आहेत. कोंडी फोडण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागत असल्याचे चित्र दिसून आले. माणगाव परिसरात वाहनांच्या तब्बल चार ते पाच किलोमीटरपर्यंत लांब रांगा लागल्या असून, माणगाव आणि इंदापूर हे वाहतूक कोंडीचे मुख्य केंद्र ठरत आहेत. ही कोंडी फोडण्यासाठी महामार्गावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, परतीचा प्रवास सुखकर करण्यासाठी पोलिसांकडून वाहतुकीचं नियमन केलं जात आहे.

गणेशोत्सवासाठी कोकणात आलेल्या गणेशभक्तांनी बाप्पाला निरोप दिल्यानंतर आता मुंबईच्या दिशेनं परतीचा प्रवास सुरू केला आहे. रायगड जिल्ह्यातील एसटी स्थानकांवर सकाळपासूनच प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. मुंबई आणि पनवेलकडे जाणाऱ्या एसटी बसेस पकडण्यासाठी प्रवाशांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. खासगी वाहनांसोबतच सर्वसामान्य प्रवाशांची पसंती असलेल्या एसटी बसनं परतीचा प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे स्थानकांवर गर्दीचं नियोजन करण्याचं मोठं आव्हान प्रशासनासमोर उभं ठाकलं आहे.

दरम्यान, खासगी वाहनांची संख्या वाढल्यानं मुंबई-गोवा महामार्गावरही वाहतुकीचा वेग मंदावला आहे. माणगाव परिसरात वाहनांच्या चार ते पाच किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्या आहेत. माणगाव आणि इंदापूर परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. गणेशोत्सवानंतर मोठ्या प्रमाणात वाहनं मुंबईच्या दिशेनं रवाना होत असल्यानं महामार्गावर वाहनांचा ताण वाढला आहे.



(छायाचित्र : समीर मालोदे)

### जिल्ह्यातील बसस्थानकांमध्ये मोठी गर्दी

गणेशोत्सव आटोपून मुंबईच्या दिशेने परतीचा प्रवास सुरू झाल्याने रायगड जिल्ह्यातील विविध बसस्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी झाली आहे. मुंबई आणि पनवेलकडे जाणाऱ्या एसटी बस पकडण्यासाठी प्रवाशांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. खासगी वाहनांबरोबरच एसटीने प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढल्याने स्थानकांवरील गर्दीचे नियोजन करण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे ठाकले आहे. रविवारी अलिबाग स्थानकातही मोठी गर्दी झाली होती.



### वाहतूक कोंडीमुळे गणेशभक्तांचे हाल

कोकणातून मुंबईच्या दिशेने निघालेल्या गणेशभक्तांना मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक कोंडीचा मोठा फटका बसला. माणगाव आणि इंदापूर परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवासाचा वेग मंदावला. तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून पडल्याने लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचे हाल झाले. वाढत्या तापमानामुळे अनेकांना त्रास झाल्याचे जाणवले. दरम्यान, वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली.



### सापे-वामने रेल्वे स्थानकातील अपुऱ्या सुविधांमुळे हाल

## चाकरमान्यांचा परतीचा प्रवास जीवघेणा

**। महाड । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवानिमित्त कोकणात आलेल्या चाकरमान्यांचा पनवेल, दिवा, मुंबई व उपनगरांकडे होणारा परतीचा प्रवास अत्यंत जीवघेणा आणि थरारक ठरत आहे. कोकण रेल्वे मार्गावरील महाड तालुक्यातील सापे-वामने रेल्वे स्थानकावर प्रशासनाचे दुर्लक्ष आणि योग्य फलाटाच्या अभावामुळे प्रवाशांना अतोनात हाल सहन करावे लागत आहेत. महाड, पोलादपूर आणि मंडणगड या ग्रामीण भागातील हजारो नागरिक मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी या स्थानकावर मोठ्या संख्येने दाखल झाले होते.

सापे-वामने स्थानकावर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असणारा योग्य उंचीचा प्लॅटफॉर्म अद्यापही उपलब्ध नाही. यामुळे प्रवाशांना जड सामान आणि पाठीवर मोठ्या बॅग्ज अडकवून जीव मुठीत धरून गाडीत शिरावे लागते. विशेष गाड्या स्थानकावर अवघ्या काही मिनिटांसाठी थांबत असल्यामुळे आणि ●➤पान २ वर

> **सापे-वामने स्थानकावर योग्य फलाट आणि शेड नसल्यामुळे आम्हाला तासन्तास उन्हात आणि पावसात उघड्यावर थांबावे लागते. त्यातच शेडखाली पंखे नसणे, ट्रेनच्या दरवाज्यांवर होणारी गर्दी आणि बंद असलेले कॅन्टीन यामुळे आमचा परतीचा प्रवास अत्यंत जीवघेणा ठरत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रवाशांच्या सुरक्षेसाठी लवकरात लवकर योग्य त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.**
>
> **- हृदय तांबे, प्रवासी**

# पुढील ४८ तासांत जोरदार!

- **महाराष्ट्रासह हवामान खात्याचा अनेक राज्यांना पावसाचा इशारा**
- **रायगडसह कोकणात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

पावसाने काही काळ विश्रांती घेतल्यानंतर आता पुन्हा एकदा राज्यातील अनेक भागांत पावसाचे ढग दाटून येण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील ४८ तासांत महाराष्ट्रासह देशातील अनेक राज्यांमध्ये जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. महाराष्ट्रात रायगडसह कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील काही भागांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांसह शेतकरी आणि मच्छिमारांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याने राज्यातील अनेक भागांमध्ये खरीप पिकांवर परिणाम झाला आहे. विशेषतः मराठवाड्यात पावसाअभावी दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी अडचणीत सापडला आहे. अशा परिस्थितीत पुढील दोन दिवसांत होणारा पाऊस शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा ठरू शकतो. मात्र, काही भागांत पावसाचा जोर वाढल्यास उभ्या पिकांचे नुकसान होण्याची शक्यताही आहे.

रायगडसह कोकणातील काही भागांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता असल्याने मच्छिमारांनी समुद्रात जाण्यापूर्वी हवामानाचा अंदाज लक्षात घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जोरदार वाऱ्यामुळे समुद्र ●➤पान २ वर

### महाराष्ट्रात कुठे पावसाचा अंदाज?

महाराष्ट्रातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या कोकणातील जिल्ह्यांसह बीड, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, उत्तर महाराष्ट्रातील नाशिक आणि अहिल्यानगर तसेच विदर्भातील काही भागांत पावसाची शक्यता आहे.

## एसटीच्या ताफ्यात २०० व्होल्वो बस

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

खासगी आराम बससेवेकडे वळणाऱ्या प्रवाशांना पुन्हा एसटीकडे आकर्षित करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात लवकरच २०० स्वमालकीच्या अत्याधुनिक वातानुकूलित व्होल्वो बसेस दाखल होणार आहेत. सुरक्षितता, आरामदायीपणा आणि आधुनिक सुविधांना प्राधान्य देण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. २५० किलोमीटरपेक्षा अधिक लांब पल्ल्याच्या मार्गांवर ४५ आसनी आरामदायी बसेस, तर रात्रीच्या प्रवासासाठी शयनयान बसेस सुरू करण्याचे नियोजन आहे. प्रवाशांना मोबाईलवरून तिकीट बुकिंगची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# मराठवाड्यात चारा-पाण्याचं संकट

## चाऱ्याच्या दराने शेतकरी हैराण; जनावरे विकण्याची वेळ

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

पावसाने पाठ फिरवल्याने सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाची दाहकता वाढू लागली आहे. अनेक भागांत खरीप पिके करपली असून जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतीसोबत दुग्ध व्यवसायावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांसमोर पशुधन जगवायचे कसे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

जिल्ह्यात यंदा पावसाची मोठी तूट झाली असून, अनेक भागांत पावसाने दीर्घ खंड दिला आहे. त्यामुळे शेतातील हिरवा चारा संपत चालला आहे. उपलब्ध मक्याच्या चाऱ्याचा दर सुमारे सहा हजार रुपये टन, तर उसाच्या चाऱ्याचे दरही पाच हजार रुपये टनापर्यंत गेल्याचे सांगण्यात येत आहे. चाऱ्याचे दर वाढल्याने जनावरांचे संगोपन करणे शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे. पंढरपूर भागातून सांगोला, मंगळवेढा, माढा, करमाळा आदी भागांत चारा नेला जात आहे. मात्र, मागणीच्या तुलनेत उपलब्धता कमी असल्याने काही शेतकऱ्यांना चारा मिळणेही कठीण झाले आहे. दूध व्यवसायातून घरखर्च भागवणाऱ्या पशुपालकांचे दूध उत्पादन घटत असून, खर्च मात्र वाढत आहे. त्यामुळे काही शेतकऱ्यांसमोर नाइलाजाने पशुधन विकण्याची वेळ येत आहे.पिण्याच्या पाण्यासाठी अनेक गावांमध्ये टँकरचा आधार घ्यावा लागत असून, जनावरांच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर आहे. पिके वाचली नाहीत, चारा महागला आणि पाणी मिळेनासे झाले तर शेतकऱ्याने जनावरे जगवायची कशी? असा सवाल पशुपालकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, सीमावर्ती भागात कृत्रिम पावसाचा प्रयोग करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. मात्र त्यासोबतच सरकारने तातडीने चारा डेपो सुरू करावेत, जनावरांसाठी पाण्याची व्यवस्था करावी आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

दुष्काळ केवळ शेतातील पीक जाळत नाही; तो शेतकऱ्याच्या गोठ्यातील पशुधनही हिरावून घेतो. सरकारने आता बैठका आणि घोषणांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष चारा-पाणी उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

**विसर्जनानंतर खवय्यांची बाजारपेठेत गर्दी | चिकन-मटणासह मच्छी मार्केटही फुलले**

# मटण-चिकन खरेदीसाठी झुंबड

**। चौल । प्रतिनिधी ।**

गणपती बाप्पाला भावपूर्ण निरोप दिल्यानंतर मांसाहारावर ताव मारण्यासाठी खवय्यांनी रविवारी सकाळपासूनच बाजारपेठेत गर्दी केली. गणेशोत्सवाच्या काळात अनेकांनी मांसाहार टाळला होता. त्यामुळे विसर्जनानंतर मटण, चिकन आणि मच्छी खरेदीसाठी नागरिकांची मोठी लगबग पाहायला मिळाली. मच्छी मार्केटमध्येही सकाळपासूनच ग्राहकांची गर्दी झाली होती.

बाप्पाच्या विसर्जनानंतर मांसाहाराचा बेत आखलेल्या अनेकांनी सकाळीच मटण आणि चिकनच्या दुकानांकडे धाव घेतली. काही ठिकाणी दुकानांसमोर ग्राहकांच्या रांगा पहाटेपासूनच लागल्या होत्या. मच्छी मार्केटमध्येही पापलेट, सुरमई, बोंबिल, कोलंबी अशा विविध प्रकारच्या मच्छिची खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी पाहावयास मिळाली. दररोजपेक्षा बाजारपेठेत चांगलीच वर्दळ दिसून आली. मटणाचा दर साधारण ८०० ते १००० प्रतिकिलो, चिकन २५० ते २८० प्रतिकिलो, तर मच्छीच्या प्रकारानुसार दर असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. मागणी वाढल्याने काही ठिकाणी सकाळपासूनच मोठ्या प्रमाणात विक्री झाली. दरम्यान, बाप्पाला निरोप दिल्यानंतर बाजारपेठेत मटण, चिकन आणि मच्छी खरेदीसाठी झालेली गर्दी चर्चेचा विषय ठरली.



> अनेकांच्या घरामध्ये दहा दिवसांचे गणपती बाप्पा असल्याने समाजबांधव मासेमारीसाठी गेलेले नाहीत. त्यामुळे मच्छीची आवक कमी आहे. परंतु, तरीही आज विक्री चांगली झाली.
>
> - राजश्री गणतांडेल, मच्छी विक्रेती

> विसर्जनाच्या दिवशी आणि त्यानंतर मटण-चिकनला मागणी वाढते. यंदाही सकाळपासून ग्राहकांची मोठी गर्दी आहे. ग्राहकांची मागणी पूर्ण करण्यासाठी पहाटेपासून तयारी केली होती.
>
> - नंदकुमार निकामे, विक्रेता

# गोमांस तस्करीप्रकरणी दोघांना अटक

- **पनवेल शहर पोलिसांची कारवाई**
- **८०० किलो मांस, दोन रिक्षा व शस्त्रे जप्त**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नांदगाव येथील सिडको मैदान परिसरात गोवंशाची कत्तल करून मांसाची विक्री करण्याच्या आरोपावरून पनवेल शहर पोलिसांनी इम्रान हनिफ पटेल (३२) आणि सर्फराज मैनुद्दीन पटेल ऊर्फ हाग्या (४१) या दोघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून सुमारे ८०० किलो गोमांस, दोन ऑटोरिक्षा, दोन चाकू आणि एक कुऱ्हाड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, नांदगाव येथील सिडको मैदान परिसरात गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करण्यात आल्याची माहिती मिळाल्यानंतर कारवाई करण्यात आली. या प्रकरणात गोवंश मांस विक्रीच्या उद्देशाने कत्तल केल्याचा आरोप आहे. घटनास्थळी तीन जिवंत गोवंशीय जनावरेही आढळून आली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्यानंतर वपोनि बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि अभिजित अभंग, पोलीस उपनिरीक्षक किरण राऊत, पोहवा अमोल पाटील, योगेश दिवेकर, अविनाश गंथडे, पोना मिथुन भोसले, सोमनाथ म्हात्रे, ●➤पान २ वर

# ज्येष्ठ कलावंतांना सन्मान योजनेतून वंचित का?

■ वर्षानुवर्षे अर्ज करूनही लाभ नाही
■ रमेश कदम यांचा उपोषणाचा इशारा

| नेरळ | प्रतिनिधी |

शासनाकडून ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांसाठी सन्मानाची योजना राबविली जात असताना, पात्र असूनही कर्जत तालुक्यातील अनेक ज्येष्ठ कलावंत या योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचा आरोप करण्यात आला आहे. वर्षानुवर्षे अर्ज, पाठपुरावा आणि आश्वासनांनंतरही प्रश्न मार्गी न लागल्याने आता या वंचित कलावंतांच्या न्यायासाठी पोलीस मित्र संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते रमेश शांताराम कदम यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. मागण्या मान्य न झाल्यास ५ ऑक्टोबर २०२६ रोजी लोकमान्य टिळक चौक, कर्जत येथे बेमुदत साखळी उपोषण सुरू करण्यात येईल, असे कदम यांनी स्पष्ट केले.

राज्य सरकारच्या 'शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंत सन्मान योजने' अंतर्गत ज्येष्ठ कलावंतांना मासिक अनुदान दिले जाते. मात्र, कर्जत तालुक्यातील पात्र कलावंतांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याची तक्रार आहे. ह.भ.प. भिकाजी पडवळ महाराज, ह.भ.प. शिवराम तुपे महाराज यांच्यासह इतर पात्र लाभार्थ्यांनी अनेक वर्षांपासून शासन दरबारी पाठपुरावा करूनही त्यांच्या पदरी निराशाच पडल्याचा दावा करण्यात आला आहे.

यापूर्वीही पोलीस मित्र संघटनेच्या माध्यमातून या प्रश्नासाठी उपोषण करण्यात आले होते. त्यावेळी कर्जत तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांनी रमेश कदम यांच्या उपोषणाची दखल घेत वंचित कलावंतांना योजनेचा लाभ मिळवून देण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, आश्वासनानंतरही प्रत्यक्ष कार्यवाही झालेली नसल्याचे कदम यांनी म्हटले आहे. २०१९ पासून अर्जाची पूर्तता न झाल्याने अनेक ज्येष्ठ कलावंत योजनेपासून वंचित असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

दरम्यान, सन २०२४-२५ मध्ये ३७ लाभार्थ्यांची निवड करून त्यांना योजनेचा लाभ देण्यात आला. मात्र, अनेक वर्षांपासून अर्ज करून पाठपुरावा करणाऱ्या पडवळ आणि तुपे महाराज यांच्यासह काही वंचित पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळाला नसल्याचे कदम यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

या पार्श्वभूमीवर संपूर्ण निवड प्रक्रियेची तज्ज्ञ समितीमार्फत सखोल चौकशी करून पात्र व अपात्र लाभार्थ्यांची पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गेल्या अनेक वर्षांत या योजनेसाठी अर्ज केलेल्या सर्व लाभार्थ्यांची यादी, अर्जाच्या तारखा आणि आतापर्यंत लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांची वर्षनिहाय माहिती जाहीर करावी, अशीही मागणी कदम यांनी केली आहे. पात्र असूनही योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या ज्येष्ठ कलावंतांना न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार रमेश कदम यांनी व्यक्त केला आहे. वंचित ज्येष्ठ कलावंतांनी आंदोलनासाठी तत्काळ संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# शहरीकरणाच्या झगमगाटात परंपरा कायम

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

शहराचा विस्तार झपाट्याने होत असला, तरी धाकटा खांदा आणि मोठा खांदा येथील ग्रामस्थांनी आजही आपल्या गावची पारंपरिक संस्कृती आणि श्रद्धा जपली आहे. गौरी आगमनानंतर पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा करून शनिवारी ग्रामस्थांनी एकत्र येत गौरी विसर्जनाची मिरवणूक काढली. या मिरवणुकीत महिला वर्ग, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.



पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिलांमुळे मिरवणुकीला विशेष आकर्षण प्राप्त झाले. भजन-कीर्तनाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात गौरीला निरोप देण्यात आला. गावातील प्रत्येक घरातील नागरिक या सोहळ्यात सहभागी झाल्याने मिरवणुकीला सामूहिक एकोप्याचे स्वरूप आले होते. टाळ-मृदंगाच्या निनादात आणि 'गौरी माता की जय'च्या जयघोषात परिसर भक्तिमय झाला. शहरीकरणामुळे परिसराचे स्वरूप बदलत असले, तरी धाकटा खांदा आणि मोठा खांदा ग्रामस्थांनी आपल्या पूर्वजांपासून चालत आलेल्या परंपरा आजही जतन केल्या आहेत. नव्या पिढीलाही या संस्कृतीची ओळख व्हावी, यासाठी महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसह लहान मुलांचा सहभाग विशेष ठरला.



# बल्लाळेश्वर विसर्जन घाटावर उत्साह

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

गौरी-गणपतीच्या उत्सवानंतर शनिवारी पनवेलमधील बल्लाळेश्वर गणेश विसर्जन घाटावर भक्तांनी मोठी गर्दी केली होती. ढोल-ताशांचा गजर, 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात गौरी-गणपतीला भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी घरगुती गणपतींसह गौरींचे विसर्जन करण्यासाठी सकाळपासूनच भक्त घाटावर दाखल झाले होते. महिला वर्गाने गौरींची पूजा करून त्यांना भावपूर्ण निरोप दिला. यादरम्यान, गौरी-गणपती विसर्जनाच्या क्षणी अनेक भाविकांचे डोळे पाणावले होते. पुढील वर्षी लवकर या, अशी आर्त हाक देत भक्तांनी बाप्पाला निरोप दिला. विसर्जन घाटावर पनवेल महानगरपालिका आणि पोलिस प्रशासनाकडून आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी घाट परिसरात स्वयंसेवक तैनात करण्यात आले होते. निर्माल्य नदीत न टाकता स्वतंत्र निर्माल्य संकलनासाठी व्यवस्था करण्यात आली होती. पर्यावरणपूरक विसर्जनासाठी कृत्रिम तलावाचा वापर करण्याचे आवाहनही करण्यात आले.

# उरण दुमदुमले 'पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने!



| उरण | प्रतिनिधी |

गणरायाला शनिवारी उरण शहरासह तालुक्यात भावपूर्ण निरोप देण्यात आला. काही दिवस भक्तांच्या घरात आणि सार्वजनिक मंडळांच्या मंडपात विराजमान झालेल्या बाप्पाने अखेर भक्तांचा निरोप घेतला आणि विसर्जन मिरवणुकांनी संपूर्ण उरण नगरी दुमदुमून गेली. यावेळी भक्तांनी यथाशक्ती मनोभावे केलेली पूजा स्वीकारून गणरायासह गौरीचे विसर्जन करण्यात आले. विसर्जन सोहळा निर्विघ्नपणे पार पडावा यासाठी उरण नगरपालिकेने कृत्रिम तसेच नैसर्गिक विसर्जन स्थळी आवश्यक तयारी केली होती. छोट्या गणेशमूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्यात आले, तर मोठ्या गणेशमूर्तींचे विमला तलावात विसर्जन करण्यात आले. विसर्जनस्थळी नगरपालिका अधिकारी आणि कर्मचारी तैनात करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्षा भावना घाणेकर, नगरसेवक, अधिकारी आणि कर्मचारी वर्गाने विसर्जन व्यवस्थेवर लक्ष ठेवले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे उत्साहाला शिस्तीची जोड देत विसर्जन सोहळा शांततेत पार पडला. यावेळी उरणच्या पिरवाडी, मोरा आणि करंजा समुद्रकिनाऱ्यांवरही गणरायाच्या विसर्जनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

# प्रवेश अर्जांना ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

| अलिबाग | प्रतिनिधी |

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग तसेच संबंधित प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश अर्ज सादर करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आली आहे. आता विद्यार्थ्यांना दि. ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहेत.बारावीनंतर व्यावसायिक तसेच अव्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या योजना राबविण्यात येतात. यामध्ये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना तसेच पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना यांचा समावेश आहे. या योजनांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यात आली आहे.ऑनलाइन अर्ज सादर करताना विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचणी येत असल्याने नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज सादर करण्यासाठी अतिरिक्त वेळ देण्यात आला आहे. त्यानुसार व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील पात्र विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबर २०२६ पूर्वी ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

ऑनलाइन अर्ज भरताना तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास विद्यार्थ्यांनी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, रायगड-अलिबाग कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक संचालक सुनील जाधव यांनी केले आहे.



● माणगाव येथील जेष्ठ पत्रकार सलीम शेख यांच्या मातोश्री आमीना शेख यांचे नुकतेच निधन झाल्याने राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सलीम शेख यांच्या जुने माणगाव येथील निवासस्थानी सांत्वनपर भेट घेतली. यावेळी मंत्री तटकरे यांच्यासमवेत राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते ॲड. राजीव साबळे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# तळा तालुक्यात वाजत-गाजत निरोप

| तळा | प्रतिनिधी |

तळा तालुक्यातील २,७१२ खासगी व १ सार्वजनिक अशा एकूण २,७१३ गणपती बाप्पांसह ११६ गौरींचे वाजत-गाजत व भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. पाच दिवसांच्या गणपतीसोबतच ज्येष्ठा गौरीचेही विसर्जन असल्याने तालुक्यात विसर्जनाची मोठी लगबग पाहायला मिळाली. सकाळपासूनच घराघरातून ''गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर'' चा जयघोष घुमत होता. तळा शहर, तळा बाजारपेठ तसेच ग्रामीण भागातील गावांमध्ये ढोल-ताशा, बँजोच्या गजरात विसर्जन मिरवणुका निघाल्या होत्या. महिला भाविकांनी गौरींचे पारंपारिक पद्धतीने पूजन करून त्यांना निरोप दिला. काही ठिकाणी नदी-नाल्यांवर तर अनेक ठिकाणी प्रशासनाने तयार केलेल्या कृत्रिम विसर्जन कुंडात पर्यावरणपूरक विसर्जन करण्यात आले. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून तळा पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



# चिरनेर परिसरात बाप्पांना भावपूर्ण निरोप

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पाच दिवसांच्या गौरी गणपतींना शनिवारी सायंकाळी भावपूर्ण निरोप देण्यात आला. अत्यंत मंगलमय



व शांततापूर्ण वातावरणात सोरला तलाव आणि गणपती देवाचा तलाव या विसर्जन तलावात अत्यंत भक्तीभावाने गणेश विसर्जन कार्यक्रम पार पडला. तालुक्यातील अनेक गणेशमूर्तींचे विसर्जन गावाजवळील नदी, तलाव या ठिकाणी करण्यात आले. दरम्यान, पावसाने सकाळपासूनच उघडीप दिल्यामुळे बाप्पाचे विसर्जन व्यवस्थितरित्या करता आले. त्यामुळे गणपती विसर्जनाला गणेशभक्तांचा उत्साह अधिक दिसून आला. यावेळी गणेशभक्तांच्या सोयीकरिता नागरिकांसह पोलीस प्रशासनाने व ग्रामपंचायत प्रशासनाने अधिक दक्षता व खबरदारी घेतली होती. सायंकाळी उशिरापर्यंत चिरनेर गावातील कातळपाडा, मुळपाडा, मधीलपाडा, रांजणपाडा, तेलीपाडा, कुंभारपाडा, चिंचपाडा अशा सात पाड्यातील गौरीसह गणरायाचे विसर्जन करण्यात आले.

# पालीत पर्यावरणस्नेही गणेशोत्सव; घराच्या टेरेसवर विसर्जन सोहळा

| पाली/वाघोशी | प्रतिनिधी |

पालितील सुजित बारसकर व कुटुंबियांनी मागील सहा वर्षांपासून जोपासलेली पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची परंपरा यंदाही तितक्याच उत्साहात व निष्ठेने कायम ठेवली आहे. त्यांनी शनिवारी (दि.१९) शाडूच्या मातीपासून साकारलेल्या गणरायाचे विसर्जन पाली येथील आपल्या राहत्या घराच्या टेरेसवर उभारलेल्या कृत्रिम पाण्याच्या टाकीत अत्यंत भक्तिभावाने पार पाडले. बारसकर कुटुंबाच्या या कौतुकास्पद आणि निसर्गपूरक उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे. या उपक्रमाविषयी माहिती देताना सुजित बारसकर यांनी सांगितले की, निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आम्ही दरवर्षी शाडूच्याच मूर्तीची स्थापना करतो



● (छायाचित्र: अमित गायकवाड)

आणि आरास व सजावटीसाठीही पूर्णपणे पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करतो. स्थानिक जलस्रोत दूषित होऊ नयेत आणि जलप्रदूषणाला आळा बसावा, या उद्देशाने विसर्जन घरातच करण्याचे आम्ही निश्चित केले. त्यानुसार घराच्या टेरेसवर टाकी तयार करून बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. तसेच, विसर्जनानंतर मिळणारी माती आणि जमा झालेले निर्माल्य एकत्र करून त्यात झाड लावले जाणार आहे. यंदा सलग सहाव्या वर्षी पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव यशस्वीरीत्या साजरा केला असून, यापुढेही दरवर्षी अशाच प्रकारे निसर्गाचा सन्मान करत गणेशोत्सव साजरा करण्याचा ठाम निर्धार समृद्धी बारसकर यांनी व्यक्त केला.

# श्रीवर्धनमध्ये गौरी गणरायाला भावपूर्ण निरोप

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धनमध्ये गणरायाला भावपूर्ण देण्यात आला गौरी गणरायाला निरोप देण्यासाठी सर्व कुटुंबं आपल्या कुटुंबियांसोबत निघाली होती. परंतु, शनिवार असल्यामुळे पुण्यातून येणारे पर्यटक हे सगळ्यात वाहतुकीला अडथळा ठरत होते. गणेश विसर्जन मिरवणूक काळात संपूर्ण पुणे शहरामध्ये वाहतूक वेगळ्या मार्गाने वळविली जाते किंवा बंद ठेवण्यात येते. परंतु श्रीवर्धनमध्ये येणारे पर्यटक यांना समुद्रकिनारा पाहण्यासाठी पायी जाता येत नाही. कायम आपल्या चार चाकी वाहनातून त्यांना समुद्रकिनाऱ्यापर्यंत जाणे स्वागतार्ह वाटते. श्रीवर्धन शहरामध्ये अजूनही गणरायाच्या कोणत्याही मिरवणुकीमध्ये टाळ मृदुंगाच्या तालामध्ये मिरवणूक काढण्यात येते.



श्रीवर्धन शहरामध्ये दोन किंवा तीन सार्वजनिक गणपती असतात. श्रीवर्धन बसस्थानकावर बसणारा गणपती व कसबा पेठेत बसणारा गणपती यांच्या मिरवणुका देखील शांतताबद्ध पद्धतीने काढल्या जातात. मंडळाचे कार्यकर्ते जागोजागी उभे राहून वाहतुकीचे नियंत्रण करत असतात. पोलीस प्रशासनाकडून वाहतुकीचे नियंत्रण करण्यासाठी बंदोबस्त तैनात असतो. परंतु या ठिकाणी येणारे पर्यटक यांना कोकणातील गणेशोत्सव किंवा अन्य कोणत्याही गोष्टीचा ताळमेळ नसतो. आम्ही कोकणात आलो म्हणजे आम्हाला समुद्र किनाऱ्यावरती जायलाच पाहिजे. हा त्यांचा अट्टाहास असतो. परंतु श्रीवर्धन शहरामध्ये गणेश विसर्जन हे समुद्रकिनाऱ्यावर केले जाते. श्रीवर्धन शहरातील सर्व स्मशानभूमी यादेखील समुद्रकिनाऱ्यावरच आहेत.

अनेक वेळा स्मशानभूमीत कोणतेही मयत आल्यानंतर पर्यटकांमुळे मयत घेऊन जाणाऱ्या व्यक्तींना अडथळा निर्माण होतो. यापुढे श्रीवर्धन पोलिसांनी याबाबत योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. श्रीवर्धन नगरपरिषदेकडून या ठिकाणी गॅस शवदाहिनी उपलब्ध करण्यात आली आहे.

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस व संबंधितांना कळविण्यात येते की, माझे अशीलांनी मौजे मुरुड, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) प्रतिभा सुरेश मायनाक,२) साक्षी साईश रायकर, व ३) प्रियंका राहुल जयकर यांच्या कडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे. | भूमापन क्र. | क्षेत्र हे. आर. | आकार (रु.) |
|---|---|---|---|
| मुरुड, ता.मुरुड | १७१/६/ब | ०.१५.७०<br>पो.ख. ०.००.००<br>एकूण = ०.१५.७० | ०.८/- |

एकूण क्षेत्र ०.१५.७० हे. आर. पैकी खाता क्रमांक २४८९ चे क्षेत्र ०.१०.०० हे.आर. या मिळकतीवरी बांधलेले ग्रुप ग्रामपंचायत- तेलवडे हद्दीतील घर क्रमांक ३५१.

संदर्भित जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमीची असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशीलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्यात कोणत्याही व्यक्तीचा कोणत्याही प्रकारचा करार, वारस, गहाण, अभिहस्तांतरण, बक्षीस, निर्वाह, कब्जा, विक्री, दान, भाडेपट्टा, धरनाधिकार, भार, वहिवाट, बोजा, न्यास, पोटगी, सुविधाधिकार, हस्तांतरण, परवाना, कुळवहिवाट, अदलाबदल, कोणत्याही तंट्यात किंवा अन्य प्रकारे क्षोभीत असल्याने कोणताही दावा असल्यास किंवा कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांका पासून १५ दिवसांचे अवधीत माझेकडे खालील पत्त्यावर लेखी पुराव्यानीशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली हरकत माझे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक /०९/२०२६

सही/-
**(ॲड. प्रशांत एच. वर्तक)**
तथास्तु, गोकुळनगर, रेवस बायपास रोड,
चेंढरे. अलिबाग-रायगड

पान १ वरुन

## जमिनीच्या वादातून नात्याचा अंत!

भगवान पाटील आणि दीपक पांडुरंग पाटील यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

दरम्यान, मुंबई-पुणे महामार्ग, एक्स्प्रेसवे आणि औद्योगिक पट्ट्याच्या जवळिकीमुळे खालापूर तालुक्यातील जमिनींच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. ग्रामीण भागात फार्महाऊसचा वाढता ट्रेंड आणि जमिनीतील गुंतवणुकीमुळे जमिनीची किमती गगनाला भिडल्या आहेत. त्यामुळे कुटुंबातील वाटणी आणि मालकीचे वादही अधिक तीव्र होत असल्याचे चित्र आहे.

काही महिन्यांत दुसरी धक्कादायक घटनानिगडोली गावात मे महिन्यात ७५ वर्षीय रघुनाथ दत्तू फराट आणि त्यांच्या ७२ वर्षीय पत्नी सुरेखा फराट यांच्या दुहेरी हत्याकांडाने खळबळ उडाली होती. दोघांची घरात निर्घृण हत्या करण्यात आली होती. सुरेखा फराट ह्या राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घरे यांच्या आत्या होत्या. या घटनेनंतर आता जमिनीच्या वादातून लक्ष्मण डुकरे यांचा मृत्यू झाल्याने निगडोली पुन्हा हादरले आहे.

## चाकरमान्यांचा परतीचा प्रवास जीवघेणा

दरवाज्यांवर प्रचंड गर्दी असल्यामुळे अनेक प्रवाशांना पायदानवर उभे राहून किंवा दारात लटकून प्रवास करण्याची वेळ आली आहे.

भौगोलिकदृष्ट्या ग्रामीण भागात असलेल्या या स्थानकावर योग्य फलाट आणि प्रवाशांसाठी शेड नसल्यामुळे उन्हात किंवा पावसात प्रवाशांना तासनतास उघड्यावर उभे राहावे लागले. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी शेड उभारण्यात आली आहे, तिथेही पंख्यांची व्यवस्था नसल्यामुळे उकाड्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. दुसरीकडे, हजारो प्रवासी ताटकळत असताना स्थानकावरील कॅन्टीन पूर्णपणे बंद असल्यामुळे खाण्यापिण्याविना प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. योग्य फलाट नसल्यामुळे यापूर्वीही पाय घसरून खाली पडण्याच्या घटना घडल्या असून, काही लहान मुली व वयोवृद्ध व्यक्ती फलाटावरून निसटल्याच्या भयंकर घटना घडल्या आहेत; परंतु सुदैवाने मोठा अनर्थ टळला.

सापे-वामने स्थानकाच्या विकासासाठी आणि योग्य फलाट बांधण्यासाठी प्रशासनाकडून एक कोटी पंचवीस लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. कागदोपत्री मार्च २०२७ पर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असले, तरी प्रत्यक्षात या विकासकामांना अद्याप कोणतीही गती मिळालेली नाही. प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे संतप्त झालेल्या प्रवाशांनी हा जीवघेणा प्रवास तातडीने थांबवून रेल्वे प्रशासनाने सुरक्षित प्रवासाची सोय करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. दरम्यान, रेल्वेतील प्रचंड गर्दी आणि अपुऱ्या सुविधांमुळे अनेक प्रवाशांनी एसटी महामंडळाच्या बससह खाजगी गाड्या पकडून मुंबई गाठण्याचा पर्याय स्वीकारला. तरीसुद्धा रेल्वेतून प्रवास करणाऱ्या वयोवृद्ध, महिला, लहान मुले आणि तरुणांना तासनतास उभे राहून किंवा शौचालयाच्या बाजूला बसून प्रवास करावा लागत असल्यामुळे प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## गोमांस तस्करीप्रकरणी दोघांना अटक

शशिकांत काकडे आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे अंदाजे ३ लाख २० हजार रुपये किमतीचे ८०० किलो मांस, प्रत्येकी सुमारे ५० हजार रुपये किमतीच्या दोन ऑटोरिक्षा तसेच कत्तलीसाठी वापरल्याचा संशय असलेली हत्यारे हस्तगत केली आहेत.

या गुन्ह्यात आणखी काही संशयितांचा सहभाग असल्याचा पोलिसांचा संशय असून, त्यांचा शोध सुरू आहे. मांस कोठून आणण्यात आले, त्याचा पुरवठा कोणाकडून झाला, विक्री कोणाला करण्यात आली तसेच या प्रकरणात वापरण्यात आलेली वाहने व इतर साधनसामग्री याबाबत तपास सुरू आहे.

तसेच मुंबई, ठाणे आणि रायगड परिसरात मांसाच्या खरेदी-विक्रीचे जाळे कार्यरत आहे का, याचाही तपास करण्यात येत असल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे. फरार संशयितांचा शोध घेऊन त्यांच्या ताब्यातील वाहन जप्त करणेही तपासाचा भाग असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पुढील ४८ तासांत जोरदार!

खवळण्याची शक्यता असल्याने विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.

देशातील उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली, राजस्थान, हरियाणा, पंजाब, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, पश्चिम बंगाल आणि ओडिशा या भागांतही पावसाचा जोर वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. काही भागांत जोरदार वाऱ्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## बीएमडब्ल्यू कार अपघातात तीन ठार

हा अपघात रविवारी पहाटे ५ वाजून २० मिनिटांनी घडला. अपघाताची माहिती मिळताच बचाव पथक आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना नायर रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारांपूर्वीच तिघांची प्राणज्योत मालवल्याची माहिती नायर रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली.

मृतांपैकी दोघांची ओळख पटली आहे. शनाय गज्जल, धैर्य सेठ अशी त्यांची नावे असून, या अपघातात एका २५ वर्षीय तरुणाचाही मृत्यू झाला असून, त्याची ओळख अद्याप पटलेली नाही. एक २० वर्षीय तरुण या अपघातात गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सध्या नायर रुग्णालयातील ट्रॉमा वार्डमध्ये उपचार सुरू आहेत.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कवठेवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत तिचे मालक १) तुषार ज्ञानोबा बांदल २) प्रकाश रामचंद्र शिंदे ३) लोकेश तिवारी ४) सारंग शंकर कुडले यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे

| स.नं. | हि. नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|---|
| ३२ | १३ | ५ | २.१५.०० | २१=५० |

वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० (दहा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २०/०९/२०२६

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु.सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४,९२७१८६९२०२

# ‘गणपती बाप्पा मोरया.. पुढच्या वर्षी लवकर या!’







● जिल्ह्यात शनिवारी (दि.१९) गौरी-गणपतींना मोठ्या उत्साहात, बाप्पाच्या जयघोषात भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी ग्रामीण भागांसह शहरात दुपारी ३.०० वाजल्यापासून ते रात्री उशीरापर्यंत विसर्जन मिरवणूकीचा जल्लोष सुरू होता. मिरवणूकीदरम्यान ढोल-ताशांचा गजर, पारंपारिक गाण्यांच्या सुराने तसेच ‘‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’’ या जयघोषाने परिसर दुमदुमला होता. विसर्जनाच्या ठिकाणी गणेशभक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. सर्व गणेशभक्तांनी मोठ्या उत्साहाने आणि भावपूर्ण गौरी-गणपतींना निरोप दिला. यादरम्यान, पोलीस आणि स्थानिक प्रशासनाकडून ठिकठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. विशेषतः समुद्रकिनारा, तलाव, नद्या, ओढे आणि कृत्रीम तलाव याठिकाणी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. त्यामुळे विसर्जनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. (छायाचित्र- सुधीर नाझरे)

## निवडक

### कर्जतमध्ये ६,६१८ गणपतींना निरोप



**नेरळ :** कर्जत तालुक्यात शनिवारी गौरी-गणपती यांना भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. यावेळी तालुक्यातील कर्जत, नेरळ आणि दहिवली येथील गणेश घाटांवर २,५५६ गौराई तर ६,६१८ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यावेळी तालुक्यात ग्रामीण भागात पाऊस नसल्याने सायंकाळी ५.०० वाजता बाप्पांची विसर्जन मिरवणूक सुरू झाल्या. ग्रामीण भागातील बहुतेक बाप्पांना सार्वजनिक स्वरूपात वाहत्या पाण्यात विसर्जन करण्यात आले. यावेळी उल्हासनादीवर असलेला पाच गणेश विसर्जन घाटांच्या ठिकाणी नगरपरिषदेकडून विसर्जन सोहळ्याची व्यवस्था करण्यात आली होती.तसेच, कल्याण-कर्जत रस्त्याच्या बाजूला असलेल्या ब्रिटिश कालीन धरणावर घाट बनवण्यात आला आहे.तेथे देखील नेरळ गावातील आणि परिसरातील गणपतींचे विसर्जन करण्यात आले. तसेच, नेरळ-कळंब रस्त्यावर दहिवली पूल येथे ग्रामपंचायतीकडून मागील ३ वर्षांपासून गणेश विसर्जन सोहळ्याचे आयोजन केले जात आहे. यादरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता.

### मुरुडमध्ये गणपतींचे उत्साहात विसर्जन



**कोर्लई :** मुरुडमध्ये गणेशमूर्तीसह गौरी मूर्तींचे विसर्जन ढोल ताशांच्या गजरात आणि मंगलमय वातावरणात करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेच्यावतीने नाकानाक्यावर रोषणाई,गणपती विसर्जन करण्यासाठी १८ लाईफ गार्ड व मेडिसीनची व्यवस्था करण्यात आली होती. मुरुडचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली जागोजागी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यादरम्यान, ‘‘एक दोन तीन चार गणपतीचा जयजयकार’’, ‘‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’’, ‘‘गणपती गेले गावाला चैन पडेना आम्हाला’’ या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. गेल्या सात दिवसांपासून गणेशभक्तांना सकारात्मक ऊर्जा व आनंद देणाऱ्या गणरायाला निरोप देतांना गणेशभक्त हळवे झाले असले तरी त्यांच्या जल्लोषाला उधाण आले होते. यावेळी शहरातील कोळीवाडा पक्टी येथे २३० गणपती व १५० गौराईंच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

### बाप्पाच्या जयघोषाने आपटा दुमदुमले



**आपटा :** गावातील नवीन पिंपळ आळी, नवीन कोळीवाडा, गणपती आळी, जुना कोळीवाडा बाजार, पेठ गवळी आळी, सोनार आळी या सर्व परिसरात गौरी-गणपतींना भावपूर्ण निरोप देण्यात आला. यावेळी भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात घरगुती गणपतींचे विसर्जन करण्यात आले. गणरायाच्या आगमनानंतर अवघ्या सहा दिवसांत बाप्पाला निरोप देण्याची वेळ आल्याने भाविकांच्या डोळ्यांत भक्तिभावासोबतच विरहाची भावना दिसून आली. यादरम्यान ‘‘पुढच्या वर्षी लवकर या’’ म्हणत भाविकांनी गणरायाच्या मूर्ती विसर्जनासाठी नेल्या. ढोल-ताशांचा गजर, गणपती बाप्पाच्या जयघोषाने आणि फुलांच्या वर्षावाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. यावेळीपाताळगंगा नदीकिनारी असलेल्या विसर्जन घाटांवर गणेशमूर्तींना भक्तिभावाने विसर्जन करण्यात आले. दरम्यान, विसर्जनाच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राहावी, यासाठी प्रशासनाच्यावतीने विशेष खबरदारी घेण्यात आली होती.

### भक्तीमय वातावरणात निरोप

**पाताळगंगा :** ‘‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’’, ‘‘पायी हळूहळू चाला, मुखाने गजानन बोला’’ या जय घोषात रसायनी, मोहपाडा, चौक, खालापूर परिसर गणरायाच्या जयघोषाने भक्तिमय झाले होते. विसर्जनाच्या कोणतेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी अनेक ठिकाणी पोलीस बंदोबस्त होता. सर्वत्र ठिकाणी गणरायाची विसर्जनाची तयारी चालली असल्यामुळे फटक्याच्या आणि टाळ्यांच्या आवाजात गुळाला उधळून मोठ्या आनंदाने गणरायाचे विसर्जन करण्यात आले. दिड दिवसाच्या बाप्पाला निरोप दिल्यानंतर पाच दिवसाच्या बाप्पाला निरोप देताना पावसाने गणेश भक्तांची धांदल उडून दिली होती. तरीदेखील सार्वजनिक मंडळाने तसेच गावातील घरगुती गणपतीचे विसर्जन करण्यासाठी लवकरच तयारी केली होती. बाप्पाला भक्तीभावाने निरोप देत असतांना लहानापासून थोरापर्यंतचे डोळे पाणावले होते.

# म्हसळ्यात बाप्पांसह गौराईला निरोप

## || गावांसह वाड्या-वस्त्यांमध्ये भक्तिमय वातावरण || ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकांचा जल्लोष

| म्हसळा | महेश पवार |

म्हसळा तालुक्यात गणरायाच्या आगमनाने निर्माण झालेल्या भक्तिमय आणि उत्साही वातावरणाला शनिवारी (दि.१९) भावपूर्ण निरोपाची किनार लाभली. तालुक्यातील ८३ गावांसह ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्या आणि म्हसळा शहरात घरोघरी विराजमान झालेल्या बाप्पांसह गौराईला भक्तिभावाने निरोप देण्यात आला. यावेळी ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वाद्यांचा निनाद, गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष आणि पावसाच्या सरी अशा उत्साही वातावरणात विसर्जन सोहळा रंगला.

गणेशोत्सवाच्या काळात तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. त्याचबरोबर घराघरांत गौराईचे आगमन झाल्याने उत्सवाला विशेष चैतन्य प्राप्त झाले होते. यंदा मुंबईकर चाकरमान्यांचीही मोठी गर्दी पाहायला मिळाली. आपल्या गावी कुटुंबीयांसोबत गणेशोत्सव साजरा केल्यानंतर बाप्पांना निरोप देताना अनेकांच्या डोळ्यांत भावुकता, तर मनात पुढील वर्षीच्या आगमनाची ओढ दिसून आली. यावेळी विसर्जन मिरवणुकांमध्ये ढोल-ताशांच्या गजराने परिसर दुमदुमून गेला. महिला वर्गाने पारंपरिक उत्साहात सहभाग घेतला, तर लहान बाळगोपाळांसह भाविकांनीही विसर्जन घाटांवर मोठ्या संख्येने हजेरी लावली मेघराजानेही बाप्पांना निरोप देण्यासाठी हजेरी लावल्याने विसर्जन सोहळ्याला निसर्गाची साथ लाभली. पावसाच्या सरी, भक्तिमय वातावरण आणि ढोल-ताशांच्या निनादात गणरायाला निरोप देताना सर्वत्र उत्साहाचे चित्र पाहायला मिळाले.

यादरम्यान, म्हसळ्यात गौरी-गणपतींच्या विसर्जनासाठी विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दुपारी ३.०० वाजल्यापासून ते रात्री उशीरापर्यंत गौरी-गणपतींचे विसर्जन सुरु होते. त्यामुळे सर्वच ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच, यंदा गणेशोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सामाजिक एकोपा, परंपरा आणि भक्तिभावाचे दर्शन घडले. बाप्पांच्या निरोपाने उत्सवाची सांगता होत असली, तरी पुढील वर्षी गणरायाच्या आगमनाची प्रतीक्षा आता सर्वांनाच लागली आहे.



### प्रशासनाचा चोख बंदोबस्त

गौरी-गणपती विसर्जनादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस व महसूल प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेण्यात आली होती. उपविभागीय पोलीस अधिकारी योगिता कुटे आणि म्हसळ्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विविध गावांमध्ये पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्याचबरोबर तहसीलदार सचिन खाडे, मंडळ अधिकारी आणि महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी तालुक्यातील परिस्थितीचा आढावा घेत विसर्जनाचे नियोजन केले.

### विसर्जन घाटांवर मोठी गर्दी

गणरायाला निरोप देण्यासाठी महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक आणि चिमुकल्यांनी विसर्जन घाटांवर गर्दी केली होती. आरती, जयघोष आणि भावपूर्ण वातावरणात बाप्पांचे विसर्जन करण्यात आले. गौराईला निरोप देतानाही महिलांनी पारंपरिक श्रद्धा आणि उत्साह जपत सहभाग घेतला.

# पारंपारीक वाद्यांच्या गजरात निरोप

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

पाली शहरात पाच दिवसांच्या गौरी-गणपतींना शनिवारी भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. यावेळी पाली नगरपंचायतीने शहरातील विविध विसर्जन घाटांवर आवश्यक व्यवस्था केली होती. त्यामुळे गणेशभक्तांना कोणतीही अडचण न येता विसर्जन सोहळा पार पडला. गणरायाच्या विसर्जनासाठी सकाळपासूनच विविध भागांतून गणेशमूर्ती मिरवणुकीने विसर्जन घाटाकडे नेण्यात आल्या. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि ‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. भाविकांनी अत्यंत श्रद्धेने आणि भावपूर्ण वातावरणात आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. पर्यावरणाच्या दृष्टीने निर्माल्य नदीपात्रात टाकले जाऊ नये, यासाठी नगरपंचायतीकडून विविध ठिकाणी निर्माल्य संकलनाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे गणेशभक्तांनी पूजाविधीनंतरचे निर्माल्य नदीत न टाकता उपलब्ध करून देण्यात आलेल्या निर्माल्य संकलनाच्या ठिकाणी जमा केले. दरम्यान, गणपती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पाली पोलिसांकडूनही वाहतूक व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी चोख नियोजन करण्यात आले होते. पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विसर्जन मिरवणुका सुरळीत पार पडण्यासाठी आवश्यक बंदोबस्त ठेवला.



# ढोल-ताशांचा गजराने परिसर दुमदुमला

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड तालुक्यातील गौरी-गणपतींचा विसर्जन सोहळा मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात पार पडला. यावेळी मुरूडमधील तब्बल २,२३० गणपती व ६५० गौरींचे विसर्जन पारंपरिक पद्धतीने करण्यात आले.

गणेशभक्तांनी बाप्पाला निरोप देण्यासाठी ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांची आतषबाजी करत भव्य विसर्जन मिरवणुका काढल्या. ‘एक दोन तीन चार, गणपतीचा जयजयकार’, ‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’, ‘गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला’ अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. गेल्या पाच दिवसांपासून गणेशभक्तांना सकारात्मक ऊर्जा व आनंद देणाऱ्या गणरायाला निरोप देताना भक्त भावुक झाले होते. मात्र, त्याचवेळी विसर्जन मिरवणुकीतील उत्साह आणि जल्लोषाला उधाण आले होते. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत मोठ्या संख्येने नागरिक या मिरवणुकीत सहभागी झाले होते. ढोल-ताशांचा निनाद, फटाक्यांची आतषबाजी आणि जयघोषामुळे सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.




● (छायाचित्रः गणेश चोडणेकर)

# माणगावात भक्तिमय वातावरणात विसर्जन

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव शहरासह तालुक्यातील पाच दिवसांच्या घरगुती व सार्वजनिक गणपतींसह गौरींचे शनिवारी (दि.१९) भक्तिमय आणि उत्साही वातावरणात विसर्जन करण्यात आले. यावेळी गणरायाला भावपूर्ण निरोप देताना गणेशभक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. काळ व गोद नदीच्या पात्रासह विविध तलावांमध्ये विसर्जनाची प्रक्रिया पार पडली. यावेळी माणगाव पोलीस ठाण्याच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

माणगाव तालुक्यात यंदा ५,४९२ घरगुती आणि २ सार्वजनिक, असे एकूण ५,४९४ गणपतींची स्थापना करण्यात आली होती. याशिवाय १२,०९८ गौरींची स्थापना करण्यात आली होती. पाच दिवसांच्या उत्सवानंतर शनिवारी दुपारी ३.०० वाजल्यापासून रात्री उशीरापर्यंत तालुक्यातील विविध विसर्जन स्थळांवर गणेशमूर्ती व गौरींचे विसर्जन सुरू होते. माणगाव शहरातील काळ नदी तसेच माणगाव मोर्बा मार्गावरील व माणगाव बमणोली मार्गावरील गोद नदी, परिसरातील गणपती विसर्जन घाटांवर माणगाव नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. गणेश भक्तांना विसर्जनासाठी सहकार्य मिळावे, तसेच विसर्जन प्रक्रिया सुरक्षित पणे पार पडावी, यासाठी नगरपंचायतीचे कर्मचारी, स्वयंसेवक आणि पोलीस कर्मचारी घाटांवर तैनात होते. गणेश विसर्जनाच्या वेळी माणगावच्या नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक ज्ञानदेव पवार, नगरसेवक आनंद यादव, उपनगराध्यक्ष रिया उभारे, महादेव कनोजे, रणधीर कनोजे, विजय मेथा, मनिष मेथा मुख्याधिकारी संतोष माळी तसेच नगरपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.






## विसर्जनापूर्वी गौराईला डोक्यावर घेऊन फेर | डिजिटल युगात रमणाऱ्या पिढीचा सहभाग

# मल्याण गावाने जपला परंपरेचा वारसा

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील मल्याण गावाला समृद्ध सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचा वारसा लाभला आहे. आधुनिकतेच्या काळातही गावाने आपल्या अनेक परंपरा आजही श्रद्धेने आणि उत्साहाने सुरू ठेवल्या आहेत. त्यापैकीच एक वैशिष्ट्यपूर्ण परंपरा म्हणजे गौरी विसर्जनापूर्वी गौरीमातेला डोक्यावर घेऊन पारंपरिक फेर घेण्याची आणि नाचण्याची अनेक वर्षांची परंपरा जपण्यात आली आहे.



गणेशोत्सवाच्या काळात मल्याण गावात गौराईचे आगमन मोठ्या भक्तिभावाने केले जाते. गावातील परंपरेनुसार गौराई माहेर करीण मानली जाते. गणपतीच्या आगमनानंतर ती माहेरी आलेल्या मुलीप्रमाणे घरात येते आणि कुटुंबीय तिचे प्रेमाने व आदराने स्वागत करतात. दीड दिवसांच्या या वास्तव्यादरम्यान गौराईची पूजा-अर्चा केली जाते. त्यानंतर गौरी विसर्जच्यावेळी मल्याण गावातील जुनी परंपरा विशेष आकर्षण ठरते. यावेळी गौराईला डोक्यावर घेऊन गावकरी पारंपरिक फेर धरून नृत्य करतात. यावेळी संपूर्ण वातावरण भक्ती, उत्साह आणि पारंपरिक संस्कृतीच्या रंगात रंगून जाते. त्यानंतर पारंपरिक वाद्ये आणि गाण्यांच्या साथीने गावकरी गौरीईला मानाने विसर्जनासाठी घेऊन जातात. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, इंटरनेट आणि विविध मनोरंजनाची साधने उपलब्ध असतानाही मल्याण गावातील ग्रामस्थांनी ही परंपरा जपून ठेवली आहे.

यावर्षी देखील मल्याण गावाने ही परंपरा जपली आहे. संगणक आणि मोबाईलच्या युगात रमणारी पिढी देखील या उत्सवात मोठ्या सहभागी झाली होती. या पारंपरिक नृत्या बरोबरच पारंपरिक गाणी, रामायण आणि महाभारतातील विविध कथा, प्रसंग आणि पात्रांवर आधारित गाणी तसेच गौळणी घेण्यात आल्या. त्यामुळे ही केवळ धार्मिक विधी न राहता लोककला, मौखिक परंपरा आणि धार्मिक कथांचा अनोखा संगम ठरला.

# जरांगेंनी काय मिळवले

मनोज जरांगे यांचे बारावे उपोषण गेल्या आठवड्यात गुरुवारी संपले. नेहमीप्रमाणे या उपोषणाच्या निमित्ताने बातम्या झाल्या. पण त्यात पूर्वीचा जोर नव्हता. अखेर सरकारला आणखी तीन महिन्यांची मुदत देऊन जरांगेंनी उपोषण संपवले. मात्र यातून त्यांच्या किंवा मराठा समाजाच्या पदरात काय पडले हा गहन प्रश्न आहे. मराठा समाजाला मागास मानून त्यांना राखीव जागा मिळाल्या पाहिजेत या मागणीला सर्वमान्यता मिळण्यात जरांगे यांचा मोठा वाटा आहे यात शंका नाही. एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देऊन काढलेल्या मोर्चांनी याची पार्श्वभूमी तयार केली. जरांगे यांनी त्यावर कळस चढवला. पण सरकारने नुसती मागणी मान्य करून भागत नाही. ती कायद्यात बसावी लागते, तिचे नियम करावे लागतात, तिची अंमलबजावणी करून प्रत्यक्ष न्याय मिळावा लागतो. जरांगे यांच्या रेट्यामुळे मराठा आरक्षणाचा कायदा झाला खरा. पण तो न्यायालयीन निकालाची टांगती तलवार त्याच्यावर आहे. शिवाय दर काही महिन्यांनी उठून जरांगे यांचे उपोषण, त्या निमित्ताने काही लोकांच्या नावाने शिवीगाळ हे चालूच आहे. पूर्वी देवेंद्र फडणवीस हे त्यांच्या टार्गेटवर होते. आता पडद्यामागे काय घडले आहे याची कल्पना नाही. पण आता जरांगे एकनाथ शिंदे यांच्यावर अधिक तुटून पडत आहेत. एकेकाळी शिंदे यांनीच आरक्षण मिळवून दिले म्हणून त्यांचा गौरव चालू होता. याच शिंदे यांनी जरांगे यांना मुंबईत प्रवेश करू दिला नव्हता. नवी मुंबईच्या वेशीवर रोखले होते. तिथे सगेसोयऱ्यांनाही आरक्षण लागू करण्याचे तथाकथित आश्वासन दिले होते. त्यावेळी आपल्याला प्रचंड विजय मिळाला असा गाजावाजा करण्यात आला. प्रत्यक्षात हे आश्वासन फुसके असल्याचे जरांगे यांच्या लगेचच लक्षात आले किंवा नंतर लक्षात आले असे त्यांनी भासवले. त्यातून मग पुन्हा आंदोलने सुरू झाली. जरांगेंच्या या सततच्या उपोषण, आंदोलन, धमक्या, आणि माघार यांचा सत्ताधाऱ्यांना आणि जनतेलाही सराव झाला आहे. रोज मरे त्याला कोण रडे अशी अवस्था झाली आहे.

### नोंदी आणि प्रमाणपत्रे

आता आर या पार असे म्हणून गेल्या वेळी जरांगे मुंबईत आले होते. त्यावेळी त्यांनी चांगले शक्तिप्रदर्शन केले व फडणवीसांच्या नाकी नऊ आणले. पण मग फडणवीसांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. उपोषणासाठी आलेल्या मराठ्यांमुळे मुंबई कशी ठप्प झाली आहे याचा पाढा वाचला गेला. जरांगेंना पदरात काही न पडता मुंबईच्या बाहेर पडावे लागले. त्यानंतर यंदाच्या उन्हाळ्यात त्यांनी भर उन्हात उपोषण करून झाले. तेही दोन दिवसात माघारी घ्यावे लागले. तरीही उपोषण या हत्याराच्या आधारे आपण सरकारला नमवू शकतो यावर जरांगे यांचा भरवसा कायम आहे. यावेळीही त्यांनी ऐन गणपतीत उपोषण सुरू केले आणि मुंबईत येण्याचा घाट घातला. तो सरकारच्या सोईचाच होता. कारण गणपती उत्सवाचे कारण देऊन जरांगे यांना रोखणे आणि त्यांच्याविरुध्द वातावरण तयार करणे सोपे होते. उत्सवात विघ्न नको हा प्रचार प्रभावी होता. त्याला न जुमानता तसेच प्रकृती बिघडलेली असतानाही जरांगे मुंबईच्या दिशेने निघाले. पण दोन दिवसातच त्यांना आंदोलन संपवावे लागले. यावेळी तर सरकारने त्यांच्याकडे बोलणी करण्यास प्रतिनिधीही पाठवला नाही. मंत्री वगैरे भेटायला जाणे कमी झाले. भाजपचा मराठवाड्यातला एकही मराठा आमदार जरांगेंकडे गेला नाही. बाकीच्या पक्षांचे केवळ तोंडदेखले गेले. पूर्वी याच जरांगेंनी अशी काही हवा केली होती की शरद पवारयांच्यापासून अनेक भलेभले नेते, आमदार, खासदारयांना त्यांच्या दारी भेटायला जावे लागत होते. मध्यंतरी आपण निवडणुका लढवू असे सांगून जरांगेंनी नंतर कच खाल्ली. मधल्या काळात मराठा समाजाच्या नोंदी शोधण्याच्या कामाला मात्र या आंदोलनाला गती आली. जमिनीची कागदपत्रे, शाळाकॉलेजातले,नोकरीचे किंवा सरकारी खटल्यांचे कागद इत्यादींमध्ये जिथेकुठे म्हणून बापजाद्यांची नावे मराठा, कुणबी अशी नोंदली गेली होती त्या नोंदी खणून काढल्या गेल्या. अशा ५८ लाख नोंदी सापडल्या. मात्र या नोंदी सापडल्या म्हणजे लगेच या सर्वांच्या वारसदारांना राखीव जागांसाठी मराठा-कुणबी अशी प्रमाणपत्रे मिळतात असे होत नाही.

### न्यायालयातच फैसला

नोंदी शोधण्याचे काम शिंदे समितीकडे दिले गेले. आता त्या समितीला मंत्रालयात विशेष जागा दिली गेली आहे. शिवाय परवाच्या उपोषणानंतर प्रत्येक जिल्ह्यामध्ये नोंदी शोधणे व प्रमाणपत्रे देणे यासाठी उच्चाधिकार समिती स्थापन केली जाणार आहे. म्हटले तर हे जरांगे यांचे यश आहे. पण जरांगे यांना नोंदी असलेल्या सर्वांना सरसकट प्रमाणपत्रे व उद्यापासून राखीव जागांचे फायदे मिळालेले दिसायला हवे आहेत. बापजाद्यांच्या मराठा कुणबी अशा नोंदी सापडल्या तरी त्यांची पुरती खातरजमा करूनच वारसांना कुणबी प्रमाणपत्र मिळू शकते. ज्यांना ते सहज मिळण्यासारखे आहे त्यांनी ते पूर्वीच घेतले आहे. पश्चिम महाराष्ट्रात तर ते अनेकांकडे आहे असे म्हणतात. मात्र या प्रमाणपत्राच्या आधारे ओबीसी म्हणून नोकऱ्या मिळणे किंवा निवडणुका लढवणे हे वाटते तितके सोपे नाही. मराठवाड्यात तीन जणांनी अशा निवडणुका जिंकल्या. पण त्या न्यायालयीन लढाईत अडकल्या आहेत. नोकऱ्या मिळाल्या तर त्यावरही हीच टांगती तलवार राहू शकते. जोपर्यंत न्यायालयात याचा फैसला होत नाही तोवर आता गाडी पुढे जाऊ शकत नाही. राज्य सरकारने केलेल्या मराठा आरक्षणाच्या कायद्याला उच्च न्यायालयात आव्हान दिले गेले आहे. हे आव्हान देणारे भाजपच्याच गोटातले लोक आहेत असे म्हणतात. याची सुनावणी होईतो न्यायमूर्ती बदलून इतरत्र गेले. त्यामुळे आता नवीन तीन सदस्यांचे पूर्णपीठ स्थापन करून नव्याने सुनावणी करावी लागणार आहे. ती सलग रोज करता येणे कठीण आहे असे न्यायालयाने सांगितले आहे. त्यामुळे ती पूर्ण होण्यास आणखी दोनचार वर्षे जाऊ शकतात. शिवाय इथे निकाल काहीही लागला तरी प्रकरण अपिलात जाणार हे नक्की आहे. त्यामुळे येत्या किमान चारेक वर्षात तरी यावर निकाल लागण्याची शक्यता दिसत नाही. दुसरीकडे राखीव जागांसाठी ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडण्याच्या प्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयालाच फेरविचार करावा लागणार आहे. कारण मूळ निर्णय त्याच न्यायालयाच्या खंडपीठाने दिला होता. हा निर्णय जोवर होत नाही तोवर याबाबतचे बखेडे चालूच राहणार. केंद्र सरकारने दुरुस्ती करणे हा यावरचा उपाय आहे. पण मोदी सरकार मागास जातींसाठी ५० टक्क्यांची मर्यादा काढून टाकण्याबाबत चकार शब्द बोलायला तयार नाही. उलट यांच्याच परिवारातले लोक आता आरक्षण संपवा असे अधूनमधून म्हणत असतात. मध्यंतरी दिल्लीत जंतरमंतरवर आंदोलनही झाले. जरांगे आपल्या मागण्यांसाठी वातावरण तापवत राहतात हे ठीक आहे. पण या तिढ्याचा राज्य पातळीवर निकाल लागणे आता अशक्य झाले आहे.

विचार

# महागाई, वीजटंचाई आणि जिओची संधी

*अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यामध्ये महत्वाची ठरलेली बातमी म्हणजे कारखान्यात साखर स्वस्त असली तरी ग्राहकांना महाग पडत असल्याचे निदर्शनाला आले आहे. दरम्यान, शेअर बाजारात 'रिलायन्स जिओ'मध्ये गुंतवणुकीची संधी मिळणार असल्याचे स्पष्ट झाले. याच सुमारास सौरऊर्जा मुबलक असली तरी काही भागांमध्ये वीजटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे स्पष्ट झाले.*




**महेश देशपांडे**

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यामध्ये काही क्षेत्रांमध्ये लक्षवेधी घटना प्रत्ययाला आल्या. सर्वप्रथम साखरेच्या बाबतीत पुढे आलेली बातमी म्हणजे कारखान्यात साखर स्वस्त असली तरी ग्राहकांना महाग पडत असल्याचे निदर्शनाला आले आहे. दरम्यान, शेअर बाजारात 'रिलायन्स जिओ'मध्ये गुंतवणुकीची संधी मिळणार असल्याचे स्पष्ट झाले. याच सुमारास सौरऊर्जा मुबलक असली तरी काही भागात वीजटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे स्पष्ट झाले.

गेल्या काही आठवड्यांपासून गगनाला भिडलेले सारखेचे भाव ग्राहकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे; मात्र आता साखरेच्या दरात मोठी घसरण झाली असली, तरी अद्याप सर्वसामान्य ग्राहकांना त्याचा फायदा मिळताना दिसत नाही. साखर कारखान्याच्या पातळीवर म्हणजेच एक्स-मिल किमतीत मोठी घट झाली आहे; पण हीच साखर किरकोळ बाजारात पोहोचेपर्यंत तिचा दर पुन्हा वाढत आहे. त्यामुळे ग्राहकांना अजूनही साखरेसाठी जास्त पैसे मोजावे लागत आहेत. विशेष म्हणजे या दरातील मोठ्या फरकावर आता साखर कारखान्यांनीच प्रश्न उपस्थित केले आहेत. साखरेच्या एक्स-मिल किमतीत जवळपास ३० टक्क्यांची घट झाली आहे. काही आठवड्यांपूर्वी कारखान्यातून साखर सुमारे ६७ रुपये प्रति किलो दराने विकली जात होती. आता हाच दर घसरून जवळपास ४७ रुपये प्रति किलोपर्यंत आला आहे. म्हणजेच दरामध्ये जवळपास ३० टक्के घसरण झाली असली, तरी किरकोळ बाजारात मात्र साखरेचा भाव अजूनही ६० रुपयांपेक्षा जास्त आहे. साखर कारखान्यातून बाहेर पडताना ज्या दराने साखर विकली जाते, त्याला एक्स-मिल किंमत म्हणतात. त्यानंतर यात वाहतूक खर्च, घाऊक व्यापाऱ्यांचा आणि किरकोळ विक्रेत्यांचे मार्जिन यांचा समावेश होतो आणि हे सगळं होऊन शेवटी साखर ग्राहकांपर्यंत पोहोचते. त्यामुळे कारखान्यात साखरेचा भाव कमी झाला म्हणजे त्याच क्षणी दुकानातील किंमतही तितकीच कमी होईल, असे होत नाही; मात्र सध्या कारखान्यातील आणि किरकोळ बाजारातील दरामध्ये अपेक्षेपेक्षा मोठी तफावत असल्याचे कारखान्याचे म्हणणे आहे.

साखर उद्योगाच्या म्हणण्यानुसार, कारखान्यांच्या पातळीवर साखरेच्या दरात मोठी घट झाली असेल, तर त्याचा परिणाम किरकोळ बाजारातही दिसायला हवा. त्यांच्या म्हणण्यानुसार बाजारात साखरेचा तुटवडा नसून पुरवठाही सुरळीत आहे; मात्र अशा परिस्थितीतही ग्राहकांना ६० ते ६५ रुपये प्रति किलो दराने साखर घ्यावी लागत आहे. तज्ज्ञांच्या मते, किरकोळ बाजारातील दर कमी होण्यासाठी काही वेळ लागू शकतो. यामागचे एक कारण म्हणजे व्यापारी आणि दुकानदारांनी आधी खरेदी केलेल्या साखरेचा साठा जुना असू शकतो. हा साठा त्यांनी तुलनेने जास्त दराने खरेदी केला असल्याने त्यांच्याकडून अजूनही जास्त दर आकारले जात असावेत. त्यामुळे नवीन स्वस्त झालेल्या साखरेच्या दराचा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास अजून वेळ लागू शकतो. तज्ञांच्या मते एक्स-मिल किमतीतील घटीचा परिणाम हळूहळू घाऊक बाजारात आणि त्यानंतर किरकोळ बाजारात दिसण्याची शक्यता आहे; मात्र यासाठी काही दिवस लागू शकतात. काही रिपोर्टनुसार, येत्या काही दिवसांमध्ये किरकोळ बाजारात साखरेच्या किमतीत आणखी घट होण्याची शक्यता आहे; मात्र ही घट नेमकी किती असेल, हे व्यापारी नवीन साठा कोणत्या दराने खरेदी करतात आणि बाजारातील साखरेचा पुरवठा किती वेगाने वाढतो, यावर ठरेल.

आता एक लक्षवेधी अर्थवृत्त. नवरात्री आणि दिवाळीचा काळ आयपीओ गुंतवणूकदारांसाठी सुवर्णसंधी ठरू शकतो. मुकेश अंबानी यांच्या 'रिलायन्स इंडस्ट्रीज'ची दूरसंचार, डिजिटल आणि तंत्रज्ञान कंपनी, जिओ प्लॅटफॉर्म्स, ऑक्टोबरच्या अखेरीस किंवा नोव्हेंबरच्या सुरुवातीला अंदाजे चार अब्ज डॉलर्सचा आयपीओ लाँच करण्याची हालचाल करत आहे. 'रिलायन्स जिओ'चा 'आयपीओ' देशांतर्गत शेअर बाजारातील आतापर्यंतचा सर्वात मोठा इश्यू असेल. तसेच २००६ मध्ये 'रिलायन्स पेट्रोलियम'च्या लिस्टिंगनंतर 'रिलायन्स इंडस्ट्रीज ग्रुप'चा हा जवळपास दोन दशकांमधील पहिला आयपीओ असणार आहे. बहुधा जिओ ऑक्टोबरच्या अखेरीस, विशेषतः नवरात्रीच्या दिवसांच्या आसपास आपला 'आयपीओ' लाँच करण्याच्या तयारीत आहे. लाँच ऑक्टोबरच्या अखेरीस पुढे ढकलले गेले, तर नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पोहोचू शकतो. नवरात्री नाही, तर कंपनी 'आयपीओ'साठी दिवाळीचे लक्ष्य ठेवू शकते तसेच लाँचची तारीख निश्चित झाल्यावर कंपनी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी प्रचारात्मक मोहीम सुरू करेल. परदेशात तीन आठवडे आणि भारतात दोन आठवडे रोड शो होतील. नवरात्रीमध्ये आयपीओ येणार असल्यास रोडशो पुढच्या आठवड्यापासूनच सुरू होऊ शकतात. ११ ऑक्टोबरला घटस्थापनेसह नवरात्री सुरू होईल आणि २० ऑक्टोबर रोजी दसऱ्याला संपेल. बँकर्सच्या अंदाजानुसार 'जिओ'च्या 'आयपीओ'मधून सुमारे ३७ हजार ८०० कोटी रुपये उभारले जाऊ शकतात. अशा प्रकारे 'ह्युंदाई'चा रेकॉर्ड मोडून 'जिओ' आतापर्यंतचा सर्वात मोठा 'आयपीओ' बनेल.

देशात विजेची मागणी विक्रमी पातळीवर पोहोचत असतानाच मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेली सौरऊर्जा वापरता न आल्याने ऊर्जा क्षेत्रासमोर नवे आव्हान उभे राहिले आहे. ऊर्जा थिंक टँक 'एम्बर'च्या संशोधनानुसार गेल्या १५ महिन्यांमध्ये भारतातील सुमारे ११ टेरावॅट-तास सौरऊर्जेचा वापरच होऊ शकला नाही. या प्रमाणातील विजेने जवळपास एक कोटी घरांना वीजपुरवठा करता आला असता. उन्हाळ्याच्या काळात वातानुकूलन यंत्रे, पंखे तसेच शेतीपंपांचा वापर वाढल्याने देशातील विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते; मात्र याच काळात दुपारच्या वेळी सौरऊर्जेचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असतानाही ती वीज ग्रीडमध्ये सामावून घेण्यात अडचणी येत आहेत. परिणामी, काही सौर आणि पवनऊर्जा प्रकल्पांना उत्पादन कमी करण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. भारताकडे सध्या ३०० गीगावॉटपेक्षा अधिक स्वच्छ ऊर्जानिर्मिती क्षमता आहे. देशाच्या एकूण वीजनिर्मिती क्षमतेत तिचा वाटा निम्म्याहून अधिक आहे; मात्र पारेषण यंत्रणेची मर्यादित क्षमता आणि ऊर्जा साठवणुकीच्या अपुऱ्या सुविधा यामुळे उपलब्ध स्वच्छ ऊर्जेचा पूर्ण वापर करणे शक्य होत नाही. सौर किंवा पवनऊर्जा प्रकल्प वीजनिर्मिती करण्यास सक्षम असतानाही ग्रीडमध्ये वीज स्वीकारण्याची क्षमता नसल्यास उत्पादन कमी करावे लागते. या प्रक्रियेला 'कर्टेलमेंट' म्हटले जाते. यामुळे स्वच्छ ऊर्जा वाया जाण्याबरोबरच संबंधित ऊर्जा कंपन्यांनाही आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

सौरऊर्जेचे उत्पादन प्रामुख्याने दिवसा, विशेषतः दुपारच्या वेळी वाढते; मात्र कोळशावर आधारित औष्णिक वीज प्रकल्पांचे उत्पादन सौरऊर्जेतील चढ-उतारानुसार तातडीने कमी-जास्त करणे कठीण असते. त्यामुळे दुपारी मोठ्या प्रमाणावर सौरऊर्जा उपलब्ध असूनही कोळशावर आधारित वीजनिर्मिती सुरू ठेवावी लागते. संध्याकाळी सूर्य मावळल्यानंतर सौरऊर्जेचे उत्पादन झपाट्याने घटते आणि त्याच वेळी घरगुती विजेची मागणी वाढते. या परिस्थितीत साठवून ठेवलेली सौरऊर्जा उपलब्ध नसल्याने पुन्हा पारंपरिक ऊर्जा स्रोतांवर अवलंबून राहावे लागते. गुजरात आणि राजस्थान ही देशातील सौरऊर्जा निर्मितीची प्रमुख केंद्रे आहेत. देशातील सुमारे निम्मी सौरऊर्जा या भागांतून निर्माण होते; मात्र या राज्यांमध्ये निर्माण होणारी अतिरिक्त वीज इतर भागांमध्ये पोहोचवण्यासाठी आवश्यक असलेल्या पारेषण वाहिन्यांची क्षमता अनेक ठिकाणी अपुरी पडत आहे. पश्चिम भारतात सौरऊर्जेचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असताना देशातील इतर भागांमध्ये विजेची मागणी जास्त असते. त्यामुळे उत्पादन केंद्रांपासून मागणीच्या केंद्रांपर्यंत वीज पोहोचवण्यासाठी व्यापक आणि आधुनिक पारेषण व्यवस्था उभारण्याची आवश्यकता आहे. अतिरिक्त सौरऊर्जा साठवून रात्री वापरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर बॅटरी ऊर्जा साठवणूक व्यवस्था उभारणे हा या समस्येवरील महत्त्वाचा उपाय मानला जात आहे. दुपारच्या वेळी निर्माण होणारी अतिरिक्त वीज बॅटरीमध्ये साठवून संध्याकाळी किंवा रात्री मागणी वाढल्यानंतर ग्रीडला देता येऊ शकते. सरकारच्या माहितीनुसार, भारतातील बॅटरी ऊर्जा साठवणूक क्षमता सध्या सुमारे तीन गीगावॅट आहे. ही क्षमता २०३२ पर्यंत सुमारे ७४ गीगावॉटपर्यंत वाढवण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

चर्चा आजची

# नुसत्या घोषणा नकोत, शेतकऱ्याला आधार हवाय!



**राकेश लोहार**

मराठवाड्याच्या आभाळाकडे आज शेतकरी आशेने पाहतोय. पावसाची प्रतीक्षा, करपणारी पिके, रिकामी होत चाललेली पाण्याची साधने आणि डोक्यावर वाढत जाणारे कर्ज, या सगळ्यांच्या कचाट्यात शेतकरी सापडला आहे. दुष्काळ मराठवाड्यासाठी नवा नाही; मात्र दरवर्षी दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्याच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा कधी निघणार, हा खरा सवाल आहे.

शेतकरी पेरणीसाठी कर्ज काढतो, बियाणे-खत घेतो, मशागत करतो, दिवसरात्र शेतात राबतो. मात्र, पावसाने साथ सोडली की त्याची संपूर्ण मेहनत मातीमोल होते. पीक हातातून जाते, उत्पन्न थांबते; पण कर्जाचा डोंगर तसाच उभा राहतो. त्यामुळे दुष्काळ म्हणजे केवळ पाण्याचा प्रश्न नाही, तर तो शेतकऱ्याच्या संपूर्ण कुटुंबाच्या जगण्याचा प्रश्न आहे.

दुष्काळ निवारणासाठी सरकारकडून बैठका घेतल्या जातात, योजना जाहीर केल्या जातात, निधीची घोषणा होते. केंद्र आणि राज्य सरकारकडून जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, कमी पाण्यात येणारी पिके, पीक विमा आणि आपत्कालीन उपाययोजनांवर भर दिला जात असल्याचे सांगितले जाते. महाराष्ट्रासाठी २०२६-२७ मध्ये एसडीआरएफ अंतर्गत ५,७१८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, प्रश्न हा आहे की, कागदावरील या योजना आणि निधी प्रत्यक्ष संकटात सापडलेल्या शेतकऱ्यापर्यंत किती वेगाने पोहोचतो?

दुष्काळाच्या प्रश्नावर आमदार, खासदार, पालकमंत्री आणि कृषीमंत्री दत्ता भरणे यांच्या नेतृत्वाखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत दुष्काळावर चर्चा झाली, उपाययोजनांवर विचार झाला. मात्र, या बैठकीदरम्यान काजू-बदामावर ताव मारला जात असल्याचे चित्र समोर आल्यानंतर शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. हा मुद्दा केवळ काजू-बदामाचा नाही, तर संवेदनशीलतेचा आहे. एका बाजूला शेतकऱ्यांच्या शेतात पीक करपत आहे, घरात पुढच्या दिवसाची चिंता आहे, कर्जाचे हप्ते डोक्यावर आहेत; आणि दुसऱ्या बाजूला दुष्काळावर चर्चा करणाऱ्या बैठकीत काजू-बदामाची मेजवानी दिसत असेल, तर शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखे वाटणे साहजिक आहे.

शेतकऱ्याला काजू-बदाम नकोत, त्याला आपल्या शेतासाठी पाणी हवे आहे. त्याला पंचनाम्याची प्रतीक्षा नको, तर वेळेत नुकसानभरपाई हवी आहे. पीक विम्याच्या पैशासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी ठोस निर्णय हवा आणि पुढच्या हंगामासाठी सरकारचा आधार हवा.

पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करणे गरजेचे असेल तर ते झालेच पाहिजे. मात्र टँकरने गावाची तहान भागेल; शेताची तहान कशी भागणार? शेततळी, बंधारे, नाला खोलीकरण, जलसंधारण, विहिरींचे पुनर्भरण, ठिबक सिंचन आणि पाण्याचे योग्य नियोजन यावर वर्षभर काम झाले पाहिजे. दुष्काळ आल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा दुष्काळ येण्यापूर्वी त्याची तयारी झाली पाहिजे.

शेतकऱ्याचे नुकसान झाले की पंचनामे होतात, अधिकारी पाहणी करतात, अहवाल तयार होतात आणि मदतीच्या घोषणा होतात. मात्र, ही मदत शेतकऱ्याच्या खात्यात पोहोचेपर्यंत त्याची पुढची पेरणी डोक्यावर येते. त्यामुळे दुष्काळ निवारणाची संपूर्ण यंत्रणा वेगवान आणि पारदर्शक करण्याची गरज आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत, पीक विम्याची रक्कम, कर्जाबाबत दिलासा, जनावरांसाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

मराठवाड्याला दरवर्षी दुष्काळाच्या नावाखाली तात्पुरत्या घोषणा नकोत. या भागाला कायमस्वरूपी जलव्यवस्थापनाची गरज आहे. पावसाचे प्रत्येक थेंब जमिनीत मुरवणे, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, शेतीचे पीक नियोजन बदलणे आणि कमी पाण्यात चांगले उत्पादन देणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे, यावर ठोस आणि सातत्यपूर्ण काम झाले पाहिजे.

कारण, दुष्काळ पडला की सर्वात आधी शेतकऱ्याची चिंता वाढते. त्याच्या घरातील खर्च कमी होतो, मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न उभा राहतो, जनावरांच्या चाऱ्याची चिंता सुरू होते आणि कर्ज फेडण्याचा ताण वाढतो. या सगळ्याचा परिणाम केवळ एका शेतकरी कुटुंबावर होत नाही; त्याचा फटका संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसतो. म्हणून आता बैठका किती झाल्या, घोषणा किती झाल्या आणि निधी किती जाहीर झाला, यापेक्षा त्या निर्णयांचा परिणाम शेताच्या बांधावर किती दिसला, हे महत्त्वाचे आहे. दुष्काळावर चर्चा करणाऱ्या वातानुकूलित बैठकांपेक्षा शेतकऱ्याच्या कोरड्या शेतात उभे राहून त्याची व्यथा समजून घेण्याची वेळ आली आहे. बैठकीच्या टेबलावर काजू-बदाम आणि शेतकऱ्याच्या ताटात चिंता, ही परिस्थिती बदलली पाहिजे. शेतकऱ्याला मेजवानी नको, त्याच्या शेताला पाणी हवे. आश्वासन नको, हातात मदत हवी. घोषणांचा पाऊस नको, शेतात पाण्याचा थेंब हवा.

मराठवाड्याचा शेतकरी आज सरकारकडे भीक मागत नाही; तो आपल्या घामाचा हक्क मागतोय. आता सरकारने घोषणा करण्याची नव्हे, तर त्या हक्काची परतफेड करण्याची वेळ आली आहे.

लोकसंसद

## लवकरच जगाचा खरा आकार दर्शवणारा नकाशा येणार!

आपण शाळेपासून जो जगाचा नकाशा पाहत आलो आहोत, तो प्रत्यक्षात जगाचे हुबेहूब चित्र दाखवत नाही, असे म्हणणे मांडणाऱ्या नायजेरियन वंशाच्या केनियन कार्यकर्त्या २८ वर्षीय अबिम्बोला ओगुंडायरो यांनी सध्या संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार पारंपरिक मर्केटर प्रक्षेपणावर आधारित जगाच्या नकाशांमध्ये आफ्रिका खंडापेक्षा (क्षेत्रफळ ३ कोटी चौरस किमीपेक्षा अधिक) १४ पटीने लहान असलेला ग्रीनलँड (क्षेत्रफळ २१ लाख चौरस किमी) हा आफ्रिका खंडाएवढा किंवा त्याहूनही मोठा दाखवला जातो. तसेच युरोप आणि उत्तर अमेरिका खंडाचा आकारही दक्षिण गोलार्धातील आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेसारख्या खंडांपेक्षा प्रमाणाबाहेर मोठा दिसतो. वास्तविक पाहता आफ्रिका खंडात संपूर्ण अमेरिका, चीन, भारत आणि बहुतांश युरोप एकाच वेळी सामावू शकतात, इतका तो विशाल आहे. यासाठीच अबिम्बोला ओगुंडायरो यांनी 'आफ्रिका नो फिल्टर' या संस्थेच्या माध्यमातून 'करेक्ट द मॅप' ही मोहीम सुरू केली आणि मर्केटर नकाशाऐवजी सर्व खंडांचा अचूक आणि वास्तविक आकार असलेला 'इक्वल अर्थ प्रोजेक्शन' नावाचा नकाशा वापरण्याचे आवाहन केले. विशेष म्हणजे ४ सप्टेंबर २०२६ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १६४ विरुद्ध १ अशा बहुमताने आफ्रिकेचा खरा आकार दर्शवणारा नवीन जगाचा नकाशा स्वीकारण्याचा ठराव मंजूर केला आहे. एका २८ वर्षीय आफ्रिकन तरुणीच्या 'जागतिक नकाशा दुरुस्त करा' या मोहिमेला लाभलेले यश निश्चितपणे कौतुकास्पद आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# आंतरराष्ट्रीय शांतता दिन

आंतरराष्ट्रीय शांतता दिवस दरवर्षी २१ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस जगभरातील स्वयंसेवी संस्था, समुदाय, व्यक्ती आणि सरकारद्वारे साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय शांतता दिवस कधी आणि कसा सुरू झाला ते येथे जाणून घ्या. हा दिवस जगभरात शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने साजरा केला जातो. जागतिक शांतता म्हणजे केवळ हिंसाचार नसणे असा नाही तर अशा समाजांची निर्मिती जिथे प्रत्येकाला वाटेल की ते पुढे जाऊ शकतात आणि भरभराट करू शकतात. जगभरात अहिंसेचा संदेश देण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघातर्फे दरवर्षी २१ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय शांतता दिवस साजरा केला जातो. आपण आंतरराष्ट्रीय शांतता दिवस का साजरा करतो? जेणेकरून या विशेष दिवसाच्या निमित्ताने शांतता आणि शांतीचा संदेश जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवता येईल. तज्ञांच्या मते, जगातील सर्व देश आणि लोकांमध्ये शांतता राखण्यासाठी, संयुक्त राष्ट्रांनी १९८१ मध्ये जागतिक शांतता दिवस साजरा करण्याची घोषणा केली. त्यानंतर १९८२ मध्ये पहिल्यांदा जागतिक शांतता दिवस साजरा करण्यात आला, ज्याची थीम होती 'लोकांचा शांतीचा अधिकार'. १९८२ ते २००१ या काळात सप्टेंबरचा तिसरा मंगळवार हा आंतरराष्ट्रीय शांतता दिवस किंवा जागतिक शांतता दिवस म्हणून साजरा केला जात होता. मात्र २००२ पासून यासाठी २१ सप्टेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. २००२ पासून हा दिवस दरवर्षी २१ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. तसेच पांढरे कबूतर शांतीचा दूत मानले जाते. जागतिक शांतता दिनानिमित्त पांढरी कबुतरे सोडून शांततेचा संदेश दिला जातो. युनायटेड नेशन्सच्या मते, जागतिक शांतता म्हणजे केवळ हिंसाचार नसणे असा नाही, तर अशा समाजांची निर्मिती जिथे प्रत्येकाला वाटते की ते भरभराट आणि भरभराट करू शकतात. आपल्याला असे जग निर्माण करायचे आहे जिथे प्रत्येकाला त्यांची जात, धर्म, पंथ काहीही न करता समानतेने वागवले जाईल. १९८१ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी घोषित केलेला हा दिवस मानवतेसाठी सर्व मतभेदांच्या वरती उठून शांततेसाठी वचनबद्ध होण्याचा आणि शांततेची संस्कृती निर्माण करण्यासाठी योगदान देण्याचा दिवस आहे. आपल्या जीवनात शांतीचं महत्व फार मोठं आहे. ज्या ठिकाणी शांती असते त्या ठिकाणी बंधुभाव, मधुरता, समाधान आणि आनंद असतो. शांतीविना जगण्याला कोणताच अर्थ नाही. शांततेचा प्रसार, संवाद आणि समन्वय वाढवण्याचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्दिष्टाने विविध उपक्रम, चर्चासत्रे आणि कार्यक्रम योजले जातात. या दिवसाचे एक मुख्य उद्दिष्ट म्हणजे मानवजातीने एकमेकांशी संवाद साधून आणि मतभेद सोडवून शांततेच्या दिशेने पावले उचलणे. या दिवसाच्या निमित्ताने, लोक एकत्र येऊन समाजातील हिंसेचे निर्मूलन कसे करता येईल, यावर चर्चा करतात आणि शांततेच्या दिशेने कार्य करण्याची प्रतिज्ञा घेतात. शांतता ही केवळ युद्ध नसणे एवढीच मर्यादित संकल्पना नाही. शांतता म्हणजे लोकांमध्ये संवाद वाढवणे, एकमेकांना समजून घेणे, मतभेद शांततेने मिटवणे आणि समाजात सद्भावना निर्माण करणे.

आंतरराष्ट्रीय शांतता दिनाचा उद्देश म्हणजेलोकांना अहिंसा आणि सहिष्णुता शिकवणे,समाजात ऐक्य आणि परस्पर आदराची भावना रुजवणे,जागतिक संघर्ष कमी करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे. संयुक्त राष्ट्र हेही नेहमी सांगते की, शांतता ही फक्त सरकारे किंवा आंतरराष्ट्रीय संस्था निर्माण करत नाहीत. ती प्रत्येक व्यक्ती आपल्या दैनंदिन वर्तनातून निर्माण करते. आज जगात युद्ध, दहशतवाद, सामाजिक असमानता, धार्मिक मतभेद अशा अनेक आव्हानांनी मानवजातीला घेरले आहे. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय शांतता दिन फक्त औपचारिक साजरा करण्यापुरता न राहता तो प्रत्यक्षात जगण्याची गरज बनला आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ सप्टेंबर

१) श्री. श्रीकृष्ण भिमाजी थळे
गोंधळपाडा, वेश्वी, अलिबाग
२१-०९-१९४३

२) श्री. मनोहर कृष्ण भगत
स्वा.समर्थ नगर, अलिबाग
२१-०९-१९४९

३) श्री. विलास हरिभाऊ गंभीर
बाजारपेठ, अलिबाग
२१-०९-१९५१

४) श्रीम. सुप्रिया सुरेश पाटोळे
भवानी नाका, वरसोली
२१-०९-१९५१

५) श्री. राजन बाळकृष्ण नाईक
वरसोली, अलिबाग
२१-०९-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक,कृषीवल**

# कोकण रेल्वे मार्गावर विशेष गाड्या उशिराने

## वाढीव गाड्यांमुळे वेळापत्रक कोलमडले

## परतीच्या प्रवासात कोकणवासियांचे हाल

**| रोहा | प्रतिनिधी |**

गणेशाचे विसर्जन करुन परतिच्या प्रवासाला निघालेल्या गणेशभक्तांना कोकण रेल्वेने विलंबाचा झटका पुन्हा दिला आहे. कोकण रेल्वे मार्गावर विशेष गाड्या उशिराने धावत असल्याने या वाढीव गाड्यांमुळे कोकण रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले आहे. याचा मोठा फटका गणेशभक्तांना बसला आहे. गणरायाच्या स्वागतासाठी कोकणची वाट धरणाऱ्या गणेशभक्तांना यंदा रेल्वे प्रशासनानेच विलंबाचा प्रसाद दिल्याचे चित्र समोर असताना आता परतिच्या प्रवासात ही कोकण रेल्वे मार्गावर उशिराने धावत आहेत. गणेशोत्सवासाठी विशेष गाड्या सोडून प्रवाशांची सोय केल्याचा गाजावाजा केला जात असतानाच प्रत्यक्षात मात्र गाड्या वेळेवर चालविण्याची साधी व्यवस्थाही रेल्वेला सांभाळता आलेली नाही, असेच चित्र आहे. स्पेशल ११ ते १२ तास विलंबाने धावत असल्याने गणेशभक्तांचा प्रवास अक्षरशः रखडला आहे.



गणेशोत्सवासाठी लाखो गणेशभक्त कोकणाकडे रवाना होत असताना रेल्वे प्रशासनाने विशेष गाड्यांचे नियोजन केले. मात्र, गाड्या वाढल्या पण नियोजन गायब झाले, अशी संतप्त प्रतिक्रिया प्रवाशांमधून उमटत आहे. दोन गाड्यांच्या प्रचंड विलंबाचा फटका इतर सुमारे २० गाड्यांनाही बसल्याने कोकण रेल्वे मार्गावरील वाहतूक व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. गणरायाच्या दर्शनासाठी घर गाठण्याची घाई, सोबत कुटुंबीय आणि सामानाचा पसारा; मात्र स्थानकावर गाडीची प्रतीक्षा संपण्याचे नाव नाही, अशी अवस्था प्रवाशांची गावाकडे येते वेळी झाली होती. मात्र परतिच्या प्रवासात ही तासन्तास स्थानकावर बसूनही गाडीचा ठावठिकाणा नसल्याने रेल्वेच्या वेळापत्रकावरचा प्रवाशांचा विश्वासच डळमळीत झाला आहे.विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि कुटुंबासह प्रवास करणाऱ्या भाविकांचे मोठे हाल झाले. अनेकांच्या पुढील प्रवासाचे नियोजन कोलमडले, तर वेळेचे गणित पूर्णपणे बिघडले.

> **सर्व गाड्या वेळेत धावण्यासाठी व गणेशभक्तांना होणारा त्रास कमी होण्यासाठी रेल्वे प्रशासन प्रयत्न करीत आहे. प्रवाशांना होणा-या त्रास बद्दल प्रशासन दिलगिरी व्यक्त करीत असून अतिरिक्त गाड्यांमुळे होणारा त्रास लवकरच कमी होईल.**
> **कोकण रेल्वे जनसंपर्क अधिकारी**

प्रवाशांची गर्दी वाढणार हे रेल्वे प्रशासनाला आधीपासून माहीत असताना वेळापत्रकाचे नियोजन का कोलमडले, असा सवाल उपस्थित होत आहे. विशेष गाड्या सोडणे हा केवळ दिखावा ठरणार असेल आणि त्या तासन्तास उशिरानेच धावणार असतील, तर या विशेष व्यवस्थेचा उपयोग तरी काय? असा संतप्त सवाल प्रवाशांकडून केला जात आहे.गणेशोत्सव हा कोकणवासीयांसाठी भावनेचा विषय आहे.

मुंबई, पुणे आणि अन्य शहरांमध्ये राहणारे गणेशभक्त गणरायाच्या आगमनासाठी आतुरतेने गावाची वाट धरतात व पुन्हा परतत असतात. अशा वेळी त्यांच्या प्रवासाची जबाबदारी असलेल्या यंत्रणेनेच त्यांना ताटकळत ठेवणे, हा केवळ विलंब नसून नियोजनातील गंभीर हलगर्जीपणाचा नमुना असल्याची भावना व्यक्त होत आहे. गाड्या खोळंबतात, प्रवासी ताटकळतात आणि प्रशासनाकडून विलंबाची कारणे सांगितली जातात; मात्र प्रवाशांच्या वेळेचे आणि त्रासाचे काय? हा प्रश्न यानिमित्ताने ऐरणीवर आला आहे.

गणेशोत्सवाच्या गर्दीची पूर्वकल्पना असूनही जर रेल्वेचे नियोजन असे कोलमडत असेल, तर भविष्यातील गर्दी व्यवस्थापनाबाबत रेल्वे प्रशासनाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. गणरायाच्या विसर्जनानंतर निघालेल्या गणेशभक्त वेळेवर पोहोचविण्याऐवजी रेल्वेनेच त्यांची परीक्षा घेऊ नये. विशेष गाड्यांच्या नावाखाली विशेष विलंब देण्याऐवजी रेल्वे प्रशासनाने नियोजन, वेळेचे पालन आणि प्रवाशांच्या सोयीला प्राधान्य द्यावे, हीच आता प्रवाशांची मागणी आहे.

# सावली ग्रामपंचायतीकडून एचसीसी कंपनीचा निषेध

**| मुरुड | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातील सावली ग्रामपंचायत हद्दीमध्ये टोकेखार भागात कोस्टल हायवे अंतर्गत तुरुंबाडी ते टोकेखार येथे १२०० कोटी रुपये खर्च करून मोठा पूल तयार होत आहे. सागरी महामार्ग जलद पार होण्यासाठी पुलाची निर्मिती होत आहे. सदरील पूल निर्माण करण्याचे काम एचसीसी कंपनी करीत आहे.

टोकेखार भागात पुलाचे काम करण्यासाठी तसेच मजुरांना राहण्यासाठी वीज खूप आवश्यक होती. यासाठी एचसीसी कंपनीने ना हरकत दाखला मिळण्यासाठी सावली ग्रामपंचायतीमध्ये अर्ज सादर केला होता. यावेळी सावली ग्रामपंचायत ने सुद्धा काही अटी शर्ती ठेवून परवानगी देण्याचे मान्य सुद्धा केले होते. परंतु ग्रामपंचायतीमधील कोणतीही परवानगी न घेता त्यांनी वीज अन्य मार्गाने मिळवली व ग्रामपंचायतीस कोणतीही विचारणा न करता आपले काम साध्य केले. यावर ग्रामपंचायतीमधील सर्व पदाधिकारी यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

नुकत्याच झालेल्या ग्रामसभेत या बाबत तीव्र पडसाद उमटून सर्व सदस्य व पदाधिकारी यांनी निषेध व्यक्त केला आहे. ज्या भागात कंपनी काम करते त्या घटकाला विश्वासात न घेता जर कंपनी मनमानी करीत असेल तर हे कदापी सहन केले जाणार नाही अशी प्रतिक्रिया सर्वच सदस्य यांनी व्यक्त केली आहे.

याबाबत कंपनीचा निषेध करण्यात येऊन तसा बॅनर सुद्धा लावण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती देताना सावली ग्राम पंचायत प्रशासक राजेश वाडेकर यांनी सांगितले की, एचसीसी कंपनीने वीज कनेक्शन मिळण्यासाठी अर्ज केला होता. आम्ही ते देण्यास सुद्धा तयार होतो. परंतु ग्रामपंचायतीला विश्वासात न घेता त्यांनी अन्य मार्गाने वीज मिळवून ग्रामपंचायत हक्काचे खच्चीकरण केले आहे. याबाबत ग्रामसभेत चर्चा होऊन या कंपनीचा निषेध करण्यात असल्याची माहिती यावेळी त्यांनी दिली.ज्या भागात काम सुरू आहे त्या भागातील प्रशासनाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. परंतु असेच जर सर्वजण हक्काचे खच्चीकरण केले तर ग्रामपंचायतीने कारभार कसा चालवावा हा प्रश्न सर्वांना पडला आहे.

# मुरूडमध्ये भातपीक बहरले

## हवामान पोषक राहिल्याने उत्पादनात वाढीची अपेक्षा

**| मुरूड | प्रतिनिधी |**

मुरूड तालुक्यात यंदा पावसाने सुरुवातीला ओढ दिल्याने भातलागवडीला विलंब झाला, मात्र त्यानंतर झालेला पाऊस आणि सध्याचे अनुकूल हवामान यामुळे बहुतांश भागातील भातपीक बहरले आहे.

तालुक्यात सुमारे ३२०० हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड केली जाते. जया, सुवर्णा, रूपाली, शुभांगी, चिंटू आणि वाडा कोलम या वाणांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. पाणथळ व खार जमिनीत पनवेल-१, २ आणि ३ या वाणांची लागवड केली जाते. सध्या जया वाणाची वाढ चांगली झाली असून, सुवर्णासह इतर वाणांना बहर येण्यास आणखी सुमारे १५ दिवस लागण्याची शक्यता आहे.

कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले जात आहे. कार्यशाळा, चर्चासत्रे, क्षेत्रभेटी आणि परिसंवादाच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. भाताचे हळवे वाण ९५ ते ११० दिवसांत, निमगरवे वाण ११० ते १३० दिवसांत, तर गरवे वाण १३० ते १४५ दिवसांत तयार होते. यंदा सूर्यप्रकाश आणि हवामान पोषक असल्याने खोडकिडीचे प्रमाण कमी असून, उत्पादन चांगले मिळण्याचा अंदाज कृषी मित्र उल्हास वारगे यांनी व्यक्त केला.

# निलेश चव्हाण यांचे निधन

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील कमोठे येथील रहिवासी निलेश यशवंत चव्हाण (५१) यांचे १३ सप्टेंबर रोजी निधन झाले आहे. गणेशोत्सवात झालेल्या या दुःखद घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी असा परिवार आहे. ते नवीमुंबई महानगरपालिकेच्या परिचारिका विजया चव्हाण यांचे पती होते. त्यांचा दशक्रिया विधी २२ सप्टेंबर रोजी श्रीक्षेत्र चिरनेर भोम खाडी येथे होणार असून उत्तरकार्यविधी राहत्या घरी शिवरंजनी बिल्डिंग प्लॉट नं. ४९ एचपी गॅस एजन्सी जवळ, सेक्टर ६ ए कामोठे पनवेल येथे २४ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता होणार असल्याची माहिती त्यांचे नातेवाईक पत्रकार जीवन केणी यांनी दिली.

# अज्ञात इसमाचा पनवेलमध्ये मृत्यू

**| पनवेल | प्रतिनिधी |**

३० ते ३५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह सापडल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. त्याचा रंग गोरा, बांधा सडपातळ, उंची अंदाजे पाच फूट पाच इंच आहे. त्याने अंगात चॉकलेटी रंगाची अंडरवेअर परिधान केली आहे. त्याचे केस वाढलेले आहेत. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार अधिक तपास करत आहेत.

# श्रीवर्धन शहरातील स्वच्छतागृहे अद्यापही बंदच



**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन मध्ये भारत स्वच्छता अभियाना मधून अद्ययावत अशी शौचालय,स्वच्छतागृह बांधण्यात आले आहेत. मात्र या शौचालयांचे उद्घाटन होऊन देखील नगर परिषदेने शौचालय सुरू करण्यासाठी कोणत्याही प्रकारची कारवाई सुरू करण्यात आलेली नाही. मात्र या ठिकाणचा विद्युत पुरवठा सुरू असून, रात्रीच्या वेळी केवळ झगमगाट या ठिकाणी दिसून येतो.

श्रीवर्धन शहरात सी.एस.आर. फंडातून बसवण्यात आलेले पथदिवे देखील सुरुवातीला सोलर उर्जेवर चालवण्यात येतील असे सांगण्यात आले. परंतु प्रत्यक्षात हे सर्व दिवे महावितरणच्या विजेवरतीच सुरू आहेत.

श्रीवर्धन मुख्याधिकाऱ्यांना किंवा या ठिकाणी निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधींना अनेक वेळा आठवण करून सुद्धा या ठिकाणी कोणत्याही प्रकारे ही शौचालय सुरू करण्यासाठी कोणीही पुढाकार घेत नसल्याबद्दल नागरिकांमधून खेद व्यक्त करण्यात येत आहे.

शौचालयाला कायम टाळे ठोकलेले पाहायला मिळते. या ठिकाणी येणारे अनेक पर्यटक शौचालय किंवा आंघोळ करण्यासाठी अनेक रिसॉर्टमध्ये चौकशी करत असतात. परंतु श्रीवर्धन नगर परिषदेचे निद्रिस्त प्रशासन या कोणत्याही गोष्टीकडे केव्हाही लक्ष देताना पाहायला मिळत नाही.

# माध्यान्ह भोजन समितीच्या मुदतवाढीचा निर्णय मुदत संपल्यानंतर

**| रायगड | प्रतिनिधी |**

पंतप्रधान पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनात हिरव्या वाटाण्याऐवजी साधा वाटाणा दिला जात असल्याची चौकशी करणाऱ्या समितीची मुदत २६ ऑगस्टला संपली. त्यानंतर या समितीला १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. मात्र ही मुदतवाढ देण्याचा शासन निर्णय हा वाढीव मुदतवाढ संपल्यानंतर तीन दिवसांनी १८ सप्टेंबरला काढण्यात आला. त्यामुळे शालेय शिक्षण विभागाच्या या अजब कारभारावर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.

पंतप्रधान पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनात हिरव्या वाटाण्याऐवजी साधा वाटाणा दिला जात असल्याचा मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्यात आला होता. लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चा झाली. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी झाल्यानंतर शिक्षणमंत्र्यांनी सचिव स्तरावर चौकशी करण्याचे आश्वासन सभागृहात दिले होते.

### चौकशीचा अहवाल कुठे अडकला?

विद्यार्थ्यांच्या भोजनाशी संबंधित या प्रकरणात तपासणी करून शिफारशी करण्याची जबाबदारी समितीवर सोपवण्यात आली आहे. मात्र, १८ सप्टेंबरच्या शासन निर्णयात चौकशी पूर्ण झाली आहे की नाही, अहवाल सादर झाला आहे की नाही, याबाबत स्पष्ट माहिती नाही. समितीला आणखी मुदत देण्याची गरज का भासली आणि मुदतवाढीचा निर्णय विलंबाने का जाहीर झाला, याचाही खुलासा करण्याची मागणी शिक्षकांकडून करण्यात येत आहे.



शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखालील या समितीची मुदत २६ ऑगस्टला संपुष्टात आली. त्यामुळे समितीला आणखी वेळ द्यायचा असल्यास मुदत संपण्यापूर्वी किंवा त्यानंतर तातडीने निर्णय घेणे अपेक्षित होते. मात्र, विभागाने १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय १८ सप्टेंबरला जाहीर केला. त्यामुळे समितीची मुदत संपल्यानंतर तीन दिवसांनी हा शासन निर्णय काढण्याचे प्रयोजन काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे.विद्यार्थ्यांच्या पोषणाशी संबंधित महत्त्वाच्या प्रकरणात चौकशीची मुदत संपल्यानंतरच मुदतवाढीचा निर्णय जाहीर होणे, हा केवळ तारखांचा घोळ नाही; तर प्रशासकीय समन्वय आणि वेळेच्या नियोजनाबाबत प्रश्न उपस्थित करणारा प्रकार आहे, अशी टीका करण्यात येत आहे.

## उपयुक्त जलसाठा ९०.६१ टक्क्यांवर | पाणीटंचाईच्या झळा दूर

# रायगड जिल्ह्यातील २१ धरणे तुडुंब!

**| रायगड | प्रतिनिधी |**

जिल्ह्यात यंदाच्या पावसाने अक्षरशः जलक्रांती घडवून आणली आहे. आतापर्यंत पडलेल्या पावसामुळे लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीतील २८ धरणांपैकी तब्बल २१ धरणे तुडुंब भरली असून, जिल्ह्यातील एकूण उपयुक्त जलसाठा ९०.६१ टक्क्यांवर पोहोचला आहे. दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या झळा सहन करणाऱ्या अनेक गावांसाठी ही अत्यंत दिलासादायक आणि महत्त्वाची घडामोड ठरली आहे.

यंदा पाणीटंचाईची झळ जुलै महिना सुरू होईपर्यंत जाणवत होती. साधारण एक लाख ६० हजार नागरिक या टंचाईत होरपळून निघाले होते. सध्या पडत असलेल्या समाधानकारक पावसामुळे जिल्ह्यातील २१ लघुपाटबंधारे भरली असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. गणेशोत्सवादरम्यानही पावसाचे सातत्य कायम असल्यामुळे धरणांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाण्याची भर घातली.



परिणामी, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. विशेष म्हणजे, अनेक गावांमध्ये उन्हाळ्याच्या काळात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ प्रशासनावर येत होती, मात्र यंदा धरणांतील मुबलक जलसाठ्यामुळे अशी परिस्थिती उद्भवण्याची शक्यता कमी झाली आहे. यामुळे नागरिकांना मोठी दिलासा मिळाला आहे.

जलस्रोतांची पातळी वाढणार

धरणांतील वाढलेल्या जलसाठ्यामुळे विहिरी, कूपनलिका आणि इतर स्थानिक जलस्रोतांची पातळी वाढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक गावांना दीर्घकालीन लाभ मिळणार आहे.

### शेतकऱ्यांना दिलासा

लघुपाटबंधारे विभागाची धरणे केवळ पिण्याच्या पाण्यासाठीच नव्हे, तर लघु सिंचन योजना, शेतीसाठी पाणीपुरवठा आणि भूजल पुनर्भरणासाठीही अत्यंत महत्त्वाची मानली जातात. त्यामुळे धरणे भरल्याने शेतकऱ्यांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. सिंचनासाठी आवश्यक पाण्याचे नियोजन अधिक सक्षमपणे करता येणार असून, कृषी उत्पादन वाढीसाठीही याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे.

### सरासरी ९३.०८ टक्के पावसाची नोंद

जुलै महिन्यात जिल्ह्यात सरासरीपेक्षा १७३.१ टक्के पाऊस झाला. त्यानंतर पावसाने थोडी उसंत घेतली होती. १५ सप्टेंबरपर्यंत वार्षिक सरासरी पर्जन्यमानाच्या ९३.०८ टक्के पाऊस आतापर्यंत नोंदविण्यात आला आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस कोकणात पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज व्यक्त केल्याने धरणांमधील जलसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

# निवडक

## अनोळखी पुरुषाचा मृत्यू

**पनवेल :** चाळीस वर्षीय अनोळखी पुरुषाचा मृत्यू झाल्याने पनवेल शहर पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. १५ सप्टेंबर रोजी अनोळखी इसमाला थंडी ताप आल्याने त्याला उपजिल्हा रुग्णालय, पनवेल या ठिकाणी उपचारांसाठी दाखल केले होते. यावेळी डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. या मृत इसमाच्या नातेवाईकांचा शोध पोलीस उपनिरीक्षक सुनील सरगर करत आहेत.

## आयुषतर्फे आरोग्य शिबीर

**कोर्लई :** सागरी पर्यावरण रक्षण आणि प्लास्टिकमुक्त किनाऱ्याचा संदेश देण्यासाठी भारतीय तटरक्षक दलातर्फे आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता अभियान २०२६ अंतर्गत मुरुडच्या समुद्र किनारी आयोजित स्वच्छता अभियानात नांदगावच्या आयुष हॉस्पिटलनेही सहभाग घेऊन उपस्थितांना मोफत आरोग्य शिबीराचा लाभ मिळवून दिला. समुद्रकिनारे स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व तसेच समुद्रातील प्रदूषणामुळे जलचर प्राण्यांवर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत जनजागृती करणे या प्रमुख उद्देशाने आयोजित अभियानात स्वच्छता मोहिमेदरम्यान प्लास्टिक



व इतर कचऱ्यामुळे सागरी पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांबाबत उपस्थितांना जागरूक करण्यात आले तसेच समुद्रकिनारा स्वच्छ व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी नागरिकांनी जबाबदारीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचेही आवाहन करण्यात आले. या उपक्रमाच्या अनुषंगाने आयुष हॉस्पिटलतर्फे श्री गणेशा आरोग्यमम् या उपक्रमांतर्गत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाने उपस्थितांना आरोग्यविषयक सेवा तसेच नियमित आरोग्य तपासणी आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. आयुष हॉस्पिटलकडून संचालक डॉ. ऋतूज माळी, वैद्यकीय संचालक डॉ.अनिल कुमार गोस्वामी, वैद्यकीय अधिकारी डॉ.सलमान तसेच हॉस्पिटलमधील नर्सिंग व लॅबोरेटरी विभागातील कर्मचारी यात सहभागी झाले होते.या संयुक्त उपक्रमातून पर्यावरण स्वच्छता, सागरी जीवसृष्टीचे संरक्षण आणि सामुदायिक आरोग्य या तीन महत्त्वपूर्ण विषयांबाबत जनजागृती करण्याचा संदेश देण्यात आला.

## शाडू मातीच्या गणेशमूर्तीला प्रमाणपत्र



**पनवेल :** कामोठे येथील कृत्रिम तलावावर गौरी-गणपती विसर्जनाच्या ठिकाणी शाडू मातीच्या गणेशमूर्तीचे विसर्जन करणाऱ्या भाविकांना पनवेल महानगरपालिकेतर्फे प्रमाणपत्र देण्यात आले. कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योती देशमुख यांच्या हस्ते या प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.यावेळी महानगरपालिका अधिकारी, पोलीस कर्मचारी तसेच गणेशभक्त उपस्थित होते. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. कृत्रिम तलावावर विसर्जनाची व्यवस्था करण्यात आल्याने पर्यावरण संवर्धनासोबतच विसर्जन प्रक्रिया सुरळीत पार पडण्यास मदत झाली. यावेळी पोनि मनोहर पगार, शेकाप कार्याध्यक्ष गौरव पोरवाल, पत्रकार संजय कदम यांच्यासह पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मच्छीमार्केटमध्ये खवय्यांची झुंबड



**तळा :** पाच दिवसांच्या गौरी-गणपतीचे वाजत-गाजत विसर्जन झाल्यानंतर श्रावण महिन्यापासून उपवासावर असलेल्या खवय्यांनी रविवारी सकाळी तळा मच्छी मार्केट मध्ये मटण-मच्छी खरेदीसाठी एकच गर्दी केली. श्रावण महिना सुरू झाल्यापासून गणेशोत्सव संपेपर्यंत कोकणातील बहुतांश कुटुंबात मांसाहार पूर्णपणे बंद असतो. सुमारे दीड महिने शाकाहार पाळल्यानंतर गौरी-गणपतीच्या विसर्जनानंतर पहिल्या रविवारी घरोघरी मांसाहार करण्याची परंपरा आहे.त्यामुळे रविवारी पहाटेपासूनच तळा येथील मच्छी मार्केटमध्ये खवय्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. सकाळी ६ वाजल्यापासूनच मटण, मच्छी व चिकन दुकानांसमोर रांगा लागल्या होत्या.बोंबील, पापलेट, सुरमई, कोळंबी या समुद्री माशांसह बोकडाच्या मटणाला व चिकनला मोठी मागणी होती.अनेक दिवसांच्या उपवासानंतर कुटुंबासोबत मांसाहाराचा आस्वाद घेण्यासाठी ही खरेदी असल्याचे नागरिकांनी सांगितले. या गर्दीमुळे मच्छी विक्रेते व मटण व्यावसायिकांमध्येही समाधानाचे वातावरण होते. दुपारपर्यंत बाजारात गर्दी कायम होती.

## करंजाडेत दागिने लंपास

**पनवेल :** करंजाडे येथील एका बंद फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण २ लाख ६६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात घरफोडी व चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, करंजाडे सेक्टर आर/४ येथील सूर्यकिरण इमारतीमधील फ्लॅट क्रमांक २०५ येथे ही चोरी झाली. फिर्यादी पिंका प्रफुल चौधरी यांच्या घरात अज्ञात चोरट्याने प्रवेश केला. घरात कोणीच नसल्याचा फायदा घेत अज्ञात चोरांनी घरात असणाऱ्या सामानाची झडती घेत घरातील सोन्याचे झुमके, रिंग, अंगठ्या तसेच चांदीच्या अंगठ्या असा एकूण २ लाख ६६ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरीस गेला.या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरट्याचा शोध पनवेल शहर पोलिसांकडून तपास सुरू आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# रायगड जिल्ह्यात महाड पॅटर्नची चर्चा

## ।। ९०० किलो निर्माल्यातून कंपोस्ट खत निर्मिती ।। महाडच्या पर्यावरणपूरक विसर्जन मॉडेलची जिल्हाभरातून प्रशंसा

। महाड । प्रतिनिधी ।

गणेशोत्सवानंतर जिल्ह्यातील नद्यांमध्ये होणारे निर्माल्य आणि पीओपीचे प्रदूषण रोखण्यासाठी महाडमध्ये राबविण्यात आलेला प्रयोग आता संपूर्ण रायगड जिल्ह्यासाठी आदर्श मॉडेल ठरला आहे.

रोटरीचे प्रकल्प प्रमुख रोटे. डॉ. चेतन सुर्वे यांच्या नेतृत्वात रोटरी क्लब ऑफ महाड व महाड नगरपरिषदेने सिस्केप, रंगसुगंध, अक्षरशिल्प, रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट, महाड शहर विकास मंच, श्री राजेंद्र सामाजिक विकास संस्था नाते, लायन्स क्लब, सेल्फ,



पुनरावर्तन, कृषी महाविद्यालय महाड, एम. एम. जगताप कॉलेज, स्वराज्य आणि महाड पत्रकार संघ यांच्या सहकार्याने महाड पुनरावर्तन रोटरी गणेशोत्सव २०२६ यशस्वी केला.

महाड शहरातील ३ कृत्रिम तलावांत आणि घरोघरी जाऊन एकूण २३६ मूर्तींचे पर्यावरणपूरक विसर्जन करण्यात आले. यातून १२७० किलो शाडू माती आणि ५५० किलो फेकून न देता पुनरावर्तनासाठी संकलित करण्यात आले.सर्वात महत्त्वाचे म्हणजे, महाडमध्ये ८०० किलो (दि. १५ ला ३०० किलो, दि. १९ ला ५०० किलो) आणि श्री विठ्ठल मंदिर घाट, नाते येथे श्री राजेंद्र संस्था व ग्रामपंचायत नाते यांच्यामार्फत १०० किलो असे एकूण९०० किलो निव्वळ निर्माल्य वेगळे करून कृषी महाविद्यालय,महाड येथे कंपोस्ट खत निर्मितीसाठी देण्यात आले.

निर्माल्य संकलनाचे हे कार्य अनंत चतुर्दशीपर्यंत सुरू राहणार असून महाड नगरपरिषद आणि प्रिव्ही फाउंडेशन यांच्या सहकार्याने आणखी मोठ्या प्रमाणावर निर्माल्य संकलन करून कंपोस्ट खत निर्मिती करण्यात येणार आहे.

सावित्री नदी प्रदूषणमुक्त ठेवण्याचा हा महाड पॅटर्न जिल्ह्यातील इतर नगरपालिकांनीही राबवावा, अशी मागणी पर्यावरण प्रेमींमधून होत आहे.

# २०७ गणेशमूर्तींचे श्रीसदस्यांनी केले पुन्हा विसर्जन!

## डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या स्वच्छता उपक्रमाला प्रतिसाद

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

गणेशोत्सवानिमित्त पाच दिवसांच्या गणेशमूर्ती विसर्जन सोहळ्यानंतर दुसऱ्याच दिवशी मुरूड मजगाव व राजपुरी समुद्रकिनारी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या तब्बल २०७ गणेशमूर्ती वाहून आल्याचे आढळून आले. या मूर्ती समुद्रकिनारी विखुरलेल्या अवस्थेत असल्याने डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या श्रीसदस्यांनी पुढाकार घेत त्या पुन्हा खोल समुद्रात विसर्जित केल्या.

पहाटे सहा वाजताच प्रतिष्ठानचे २५ श्रीसदस्य मुरूड समुद्रकिनारी दाखल झाले. ओहोटीच्या वेळी किनाऱ्यावर वाहून आलेल्या गणेशमूर्ती एकत्रित करण्यात आल्या. त्यानंतर छोट्या बोटीच्या साहाय्याने या मूर्ती खोल समुद्रात नेऊन पुन्हा विधिवत विसर्जित करण्यात आल्या. मूर्ती विसर्जनानंतर मुरूड श्रीसदस्यांनी संपूर्ण समुद्रकिनारा



स्वच्छ केला. येणाऱ्या पर्यटकांना भग्न मूर्ती किंवा निर्माल्य दिसू नये, यासाठी सकाळपासूनच स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

मुरूड शहरासह पंचक्रोशी भागात दरवर्षी ५०० हून अधिक प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती मागविल्या जात असल्याचे सांगण्यात येते. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींवर बंदी घालण्याबाबत अनेकदा प्रयत्न झाले असले, तरी त्यांचा वापर पूर्णपणे थांबलेला नाही. शाडूच्या मूर्तींच्या तुलनेत प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती स्वस्त मिळत असल्याने काही भाविकांकडून त्यांना अद्याप पसंती दिली जाते.

महाराष्ट्र भूषण डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी श्रीसदस्यांना नेहमीच कोकणातील समुद्रकिनारे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करतात. परिसर स्वच्छ असेल तर निरोगी आयुष्य जगता येते, त्यामुळे प्रत्येकाने स्वच्छतेसाठी योगदान देणे गरजेचे आहे, असा संदेश त्यांच्या माध्यमातून दिला जातो. स्वतःचे घर आणि परिसर स्वच्छ ठेवणे हीच खरी देशसेवा असून, सुंदर देशासाठी प्रत्येकाने आपले योगदान दिले पाहिजे, असेही ते सांगतात.

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचे प्रमाण पूर्वीच्या तुलनेत कमी झाले असले, तरी त्यांचा वापर अद्याप पूर्णपणे बंद झालेला नाही. पर्यावरणासाठी घातक असलेल्या अशा मूर्तींचा वापर टाळून शाडूच्या मातीच्या मूर्तींचा स्वीकार करण्याबाबत जनजागृती केली जात आहे. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान मुरूडचे श्रीसदस्य गेल्या अनेक वर्षांपासून गणेशमूर्ती विसर्जन तसेच समुद्रकिनारा स्वच्छतेचे कार्य करत आहेत. मात्र, केवळ स्वच्छता मोहिमांबरोबरच नागरिकांमध्ये जनजागृती होऊन त्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

# दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर बाप्पांना भावपूर्ण निरोप



। कापोली । प्रतिनिधी ।

दिवेआगर येथे पाच दिवसांच्या गणपती बाप्पांचे विसर्जन अत्यंत भक्तिमय वातावरण, शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले.

बोर्लीपंचतन व परीसरातील शेकडो लहान मोठ्या गणपती बाप्पांच्या मूर्ती विसर्जनासाठी दिवेआगर येथील स्वच्छ व सुरक्षित समुद्र किनाऱ्यावर अगदी उशिरापर्यंत श्रद्धावान घेऊन येत असतात. त्यामुळे कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून ह्यावर्षी सरपंच विजय तोडणकर यांच्या नियोजनातील ५ महत्त्वाचे बदल करून अतिरिक्त प्रकाश व्यवस्था केली होती.

विसर्जनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांची आणि ग्रामस्थांची तहान भागवण्यासाठी किनाऱ्यालगत पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय केली गेली.तातडीची वैद्यकीय मदत: कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास वैद्यकीय मदत मिळावी यासाठी किनाऱ्यावर रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात आली होती.वाहनांची पार्किंग व्यवस्था: गावाबाहेरून आणि पंचक्रोशीतून येणाऱ्या वाहनांची कोंडी होऊ नये म्हणून विस्तीर्ण व सुयोग्य पार्किंग झोन तयार करण्यात आले. दिघी सागरी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

# तळा स्थानकातून विशेष गाड्यांतून चाकरमान्यांची परतीची वाहतूक




। तळा । प्रतिनिधी ।

आपल्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिल्यानंतर गणेशोत्सवासाठी गावाला आलेले चाकरमानी पुन्हा परतीच्या प्रवासाला लागले आहेत. यामुळे तळा बस स्थानकात प्रवाशांची गर्दी झाल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

कोकणात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यासाठी मोठ्या संख्येने नोकरी धंद्यासाठी व कामानिमित्त शहरांमध्ये स्थलांतरित झालेले नागरिक गणेशोत्सवासाठी आपल्या गावी परतत असतात.यानिमित्ताने वर्षभरातून एकदा संपूर्ण कुटुंब एकत्र येऊन सुखदुःखाच्या गोष्टी रंगतात. दैनंदिन जीवनातील आठवणींची देवाणघेवाण होते. गणेशोत्सव काळात पाच दिवस गणरायाची मनोभावे पूजा अर्चा, आरती, भजन करून शेवटच्या दिवशी बाप्पाला भावपूर्ण वातावरणात निरोप देऊन पुढल्या वर्षी लवकर या असा आग्रह धरून चाकरमानी पुन्हा आपल्या परतीच्या प्रवासाला लागले आहेत. गणेशोत्सव आटोपल्यानंतर तळा बस स्थानकातून मुंबईकडे परतणाऱ्या चाकरमान्यांची वाहतूक एसटी प्रशासनाने सुखरूप व नियोजनबद्ध पद्धतीने मार्गस्थ केली.यंदा तळा बस स्थानकातून एकूण ५३ विशेष गाड्यांचे नियोजन करण्यात आले होते. यामध्ये २१ आरक्षित गाड्या व ३२ ग्रुप बुकिंगच्या गाड्यांचा समावेश होता.ही वाहतूक सुरक्षित व सुरळीत पार पाडण्यासाठी राज्य परिवहन विभागीय कार्यालयाकडून विशेष लक्ष देण्यात आले. वाहतूक निरीक्षक अजिंक्य रोहेकर, वाहतूक नियंत्रक विकास खाडे व मालुसरे यांनी गाड्यांचे वेळापत्रक व नियोजन केले.




● ॲड.नम्रता सुभाष नाईक नागाव बंदर

## गौरी-गणपतींना साश्रु नयनांनी निरोप

**श्रीवर्धन :** गेले काही दिवस आनंदाने आणि भक्तीभावाने भजन-पूजन केल्यावर शनिवारी मोठ्या जड अंतःकरणाने भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला आणि गौराईला निरोप दिला. यावेळी नाक्यानाक्यावर टाळ मृदंगाच्या साथीने भजने आणि आरत्या करत गणेशमूर्ती विसर्जनासाठी समुद्रकिनाऱ्यावर मार्गस्थ झाल्या.




● भावेश अरुण परब विद्यानगर - चेंढरे अलिबाग

# पारंपरिक पद्धतीने लाडक्या बाप्पाचे विसर्जन

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

गावची परंपरा जपत गोमाशी येथे आज बाप्पाचे विसर्जन अत्यंत भक्तीभावात आणि पारंपरिक पद्धतीने करण्यात आले.गेली सहा दिवस लाडक्या बाप्पाची मनोभावे सेवा केल्यानंतर आज ग्रामस्थांनी एकत्र येत बाप्पाला निरोप दिला.

गोमाशी येथील नदीकाठी सर्व गणेश मूर्ती एकत्र आणण्यात आल्या होत्या.विसर्जनापूर्वी सर्व बाप्पांची एकत्रित आरती करण्यात आली.यावेळी लहान मुले, महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. हातात आरतीचे ताट घेऊन गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या चा जयघोष करत



ग्रामस्थांनी बाप्पाचे विसर्जन केले. कोणताही गाजावाजा न करता, पर्यावरणाला कोणतीही हानी न पोहोचवता शांततेत विसर्जन पार पडले. यावेळी ज्येष्ठांच्या हस्ते पूजा करण्यात आली.

**लोककलेची समृद्ध परंपरा** | रसिक प्रेक्षकांची मने जिंकणारे नृत्य

# शक्ती-तुरा अन् बाल्या नृत्याचा जिल्ह्यात आविष्कार

। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।

महाराष्ट्राला लाभलेली लोककलेची समृद्ध परंपरा विशेषतः कोकणात गणेशोत्सवाच्या काळात अधिकच चैतन्यमयी होऊन उठते. गणरायाच्या आगमनाने रायगड जिल्ह्यातील गावागावांत ढोलकीचा ताल, टाळांचा गजर आणि जाखडी नृत्याची रंगत पाहायला मिळत आहे. याच परंपरेचा अनोखा आविष्कार शुक्रवारी (दि. १८) सुधागड तालुक्यातील नाडसूर येथे अनुभवायला मिळाला. तेथे आयोजित भव्य शक्ती-तुरा सामन्याने आणि बाल्या नृत्याच्या आवर्तनांनी हजारो रसिक प्रेक्षकांची मने जिंकली.

सुधागड पंचायत समितीचे



उपसभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष संदेश परशुराम शेवाळे यांच्या वतीने नाडसूर येथील वैतागवाडी येथे या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी २ वाजता सुरू झालेल्या या लोककलेच्या सोहळ्यात तांडदेव घराण्याचे तुरेवाले शाहीर योगेश जाधव (मु. पहूर-रोहा) आणि भानुदास घराण्याच्या शक्तिवाल्या वृदाली दळवी (महाडिक) यांच्यात कलगीतुऱ्याची चुरशीची जुगलबंदी रंगली. पौराणिक कथा, आध्यात्मिक चिंतन आणि लोकसंगीताच्या सुरेल मिलाफातून रंगलेल्या या सामन्याला सुधागड आणि परिसरातील रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दुसरीकडे, कोकणातील पारंपरिक बाल्या नाच, जाखडी नृत्य, भजन आणि कीर्तनाचे ताफ गावोगावी सक्रिय झाले आहेत. आधुनिकतेच्या युगात लोप पावत चाललेल्या या कलेला पुन्हा जिवंत ठेवण्यासाठी तरुण पिढी मोठ्या संख्येने पुढे आली आहे. सुधागड तालुक्यातील श्री दत्त गुरु नाच मंडळ आणि चव्हाणवाडी ग्रामस्थ मंडळाने तब्बल २२ वर्षांनंतर जाखडी नृत्याची परंपरा पुनरुज्जीवित केली आहे. विशेष म्हणजे यात पदवीधर, इंजिनिअर तरुण आणि युवतींचाही मोठा सहभाग दिसून येत आहे. पेण तालुक्यातील दुरशेत येथील सुशिक्षित तरुणही मागील १६ वर्षांपासून ही कला जोपासत आहेत.

एकीकडे ठाणे-भिवंडीत पुंडलिकबुवा मोरे, तेजस मोरे आणि सौजस मोरे हे लोकसंगीताचे धडे देत समाजप्रबोधन करत आहेत, तर दुसरीकडे रायगडातील तरुणाई आपल्या पूर्वजांचा हा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहे. शुक्रवारी नाडसूर येथे पार पडलेला हा सोहळा कोकणच्या लोककलेला नवा उत्साह आणि संजीवनी देणारा ठरला आहे.

# निवडक

## रोह्यात बाप्पांसह गौराईंना निरोप!



**रोहा :** रोहा तालुक्यात पाच दिवसांच्या ९४५ गणरायांसह २७५ गौराईंचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. ताशे, ढोल-ताशे, टाळ-मृदुंगाच्या गजरात तसेच गुलालाची उधळण करत 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात भक्तांनी लाडक्या बाप्पाला निरोप दिला. यावेळी शहरातील प्रमुख विसर्जन घाटांवर मोठी गर्दी झाली होती.गणपती विसर्जनासाठी रोहा नगरपालिकेच्या वतीने विसर्जन स्थळांवर विशेष व्यवस्था करण्यात आली होती. दमखाडी घाट, बंदर पकटी घाट, अष्टमी घाट आणि फरशी घाट या चार प्रमुख विसर्जन घाटांची स्वच्छता करून विद्युत रोषणाई करण्यात आली होती.दुपारनंतर घरगुती गणपती विसर्जनासाठी भक्तगण नदीकिनारी येऊ लागले. लेझिम, ढोल-ताशे, टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात गणरायांचे विसर्जन करण्यात आले. महसूल व पोलिस प्रशासनाच्या वतीने विसर्जन मार्गांवर गस्त घालून वाहतूक सुरळीत ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली होती. कुंडलिका नदीकिनारी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी रोह्याचे पोलीस निरीक्षक अभय शेलार यांनी विविध विसर्जन स्थळांची पाहणी केली. तसेच पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तालुक्यात पाच दिवसांच्या उत्सवानंतर एकूण ९४५ गणपती बाप्पा आणि २७५ गौराईंचे विसर्जन करण्यात आले.

## बाळसईत बाप्पांना भावपूर्ण निरोप

**सुकेळी :** 'गणपती बाप्पा मोरया...पुढच्या वर्षी लवकर या....' या नामघोषाने नागोठणे जवळच असलेल्या बाळसई येथील पाच दिवसांच्या मुक्कामी असलेल्या बाप्पांना सर्वच गणेश भक्तांनी जड अंतःकरणाने भावपूर्ण निरोप दिला. नागोठणे विभागातील बाळसई , वांगणी, आमडोशी, सुकेळी, वाकण, पाटणसई आदी परिसरातील भक्तांनी गणरायाला निरोप दिला.ढोल-ताशाच्या गजरात तसेच गणरायाच्या नामघोषात बाळसई गावातील सर्वच ग्रामस्थांनी आपल्या लाडक्या बाप्पाची पाच दिवस सेवा केल्यानंतर भावपूर्ण अत:करणाने निरोप दिला. नागोठणे विभागामध्ये नागोठणे पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी रविंद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच ठिकाणी गणपती विसर्जन सोहळा अतिशय शांततेत पार पडला. बाळसई गावामध्ये देखील गावचे अध्यक्ष मधुकर ठमके यांच्या नेतृत्वाखाली गणपती विसर्जन सोहळा उत्साहात पार पडला.



## मुस्लिम नेत्यांकडून भक्तांचे स्वागत



**नेरळ :** माथेरान शहरात आलेल्या बाप्पांना निरोप देण्यात आला. शहरातून बावडी येथील गणेश घाटांवर जाणाऱ्या बाप्पांवर पुष्पवृष्टी आणि गणेशभक्तांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत अशी परंपरा माथेरानमध्ये पाहायला मिळाली. माथेरानमधील पाच दिवसाच्या गणपतींचे बेंजोच्या तालावर ढोल ताशांच्या गजरात गणपती बाप्पाना निरोप देण्यात आला. माथेरान येथील शारलोट लेक आणि बावडी येथील गणेश घाट अशा दोन ठिकाणी विसर्जन होत असते.विखुरलेली लोकवस्ती यामुळे माथेरान मध्ये त्या त्या भागातील गणेशभक्त सोयीचे बघून आपल्या बाप्पांचे विसर्जन करतात. माथेरानमध्ये पाच दिवसाच्या गणपती विसर्जनाला मोठी गर्दी दिसून आली. शहरात गणेश विसर्जनाच्या वाटेवर माथेरान मुस्लिम समाज आणि विसर्जनस्थळी कोकणवासिय समाज सर्व गणेशभक्तांचे स्वागत केले. यावर्षी नगरपरिषद माथेरानच्या वतीने विसर्जनाच्या वाटेवरील पथदिवे तसेच विसर्जनस्थळी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. गौरी गणपती विसर्जन मिरवणुकीचे स्वागत नगरसेविका तथा दिव्यांग कल्याण सभापती रिझवाना अनिस शेख, नगरसेवक सोहेल महापुळे यांच्या पुढाकाराने आणि मुस्लिम धर्मीय कार्यकर्ते अनिस शेख,आलम मुजावर, तनवीर मुजावर, इम्रान महापुळे, मगदूम महापुळे, अली असगर डोंगरे, अफझल डोंगरे, अब्दुल महापुळे ईरफान शेख ,जैनुल महापुळे,कबिर महापुरे, सादिक महापुळे आदी मुस्लिम युवकांनी सहभाग घेत गणेशभक्तांना गुलाब पुष्प आणि कॉफी देऊन स्वागत केले.

## किनारपट्टी स्वच्छता अभियानात एनएसएस स्वयंसेवकांचा सहभाग



**कोर्लई :** सागरी पर्यावरण रक्षण आणि प्लास्टिकमुक्त किनाऱ्याचा संदेश देण्यासाठी भारतीय तटरक्षक दलातर्फे आंतरराष्ट्रीय किनारपट्टी स्वच्छता अभियान २०२६ अंतर्गत मुरुडच्या समुद्र किनारी आयोजित स्वच्छता अभियानात वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या एनएनएसच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. यावेळी समुद्र किनाऱ्यावर साचलेला प्लास्टिक कचरा, पाण्याच्या बाटल्या, रॅपर्स आणि इतर टाकाऊ वस्तू गोळा करून त्यांची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी वर्गीकरण करण्यात आले. महाविद्यालयाच्या विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रवेश पाटील, प्रा. सिद्धेश सतवीडकर आणि रुफी हसवारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय पातळीवरील या महत्त्वाच्या अभियानात सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड.इस्माईल घोले, विश्वास चव्हाण, वासंती उमरोटकर तसेच प्राचार्य डॉ.जे.के.कांबळे व सर्व प्राध्यापकांनी आणि तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांनी एनएनएस विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल समाधान व्यक्त केले.

## हात न लावता डोक्यावर गौरी-गणपतीला नाचवण्याची परंपरा

**| खरोशी | प्रतिनिधी |**

खरोशी गावातील गणेश विसर्जन सोहळा हा जिल्ह्यासाठी एक आश्चर्य आणि श्रद्धेचा विषय ठरला आहे. आज पाच दिवसांचे गौरी गणपती विसर्जन करण्यासाठी निघाले असता गौराईला आणि गणपती बाप्पाला घेऊन नाचवताना भक्त दिसत होते.यावेळी गावकऱ्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटल्यागत झाले आणि गावकरी परत एकदा अवाक झाले. वाजत गाजत गावकरी बंधू आनंदाने भक्तीमय वातावरणात मिरवणुकीत सहभागी झाले होते.



येथील नामदेव कृष्णा पाटील हे गेली २५ ते ३० वर्षे एक अशी परंपरा जपत आहेत, जी पाहून प्रत्येकजण थक्क होतो. विसर्जनाला मूर्ती काढल्यानंतर एकदा गणपती बाप्पा त्यांच्या डोक्यावर बसले की, ते मूर्तीला पुन्हा हातच लावत नाहीत. कोणत्याही आधाराशिवाय, केवळ डोक्यावर बाप्पाला तोलून धरत ते गावभर नाचत नाचत विसर्जनाला घेऊन जातात. डोक्यावर बाप्पा घेऊन घरापासून नदीच्या घाटापर्यंत नाचत नाचत बाप्पाला फिरवण्याची कला फक्त नामदेव पाटील यांच्याच अंगात दिसून येते.

# पनवेल-कर्जत प्रवास सुसाट!

- **१०.८६ किमी मार्गाचा विस्तार होणार**
- **रोज पाच गाड्या अतिरिक्त धावणार**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल-कर्जतरेल्वेमार्गावरील चौक-कर्जतदरम्यानच्या १०.८६ किलोमीटर एकेरी मार्गाचे दुपदरीकरण करण्यास भारतीय रेल्वेने मंजुरी दिली आहे. ४९७ कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे मार्गाची क्षमता वाढणार असून, दोन्ही दिशांना दररोज पाच अतिरिक्त प्रवासी गाड्या चालविणे शक्य होणार आहे. तसेच वर्षाला १८.३५ दशलक्ष टन अतिरिक्त मालवाहतूक हाताळता येणार असल्याने मालगाड्यांचा खोळंबाही कमी होईल.

चौक-कर्जत हा पनवेल-कर्जत मार्गाचा महत्त्वाचा विभाग आहे. सध्या या ठिकाणी एकेरी मार्ग असल्याने रेल्वे गाड्यांच्या वाहतुकीवर मर्यादा येतात. दुपदरीकरणानंतर दोन्ही दिशांना स्वतंत्र मार्ग उपलब्ध होऊन रेल्वे वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे. क्षमता वाढविण्यासाठीच्या दुपदरीकरण, तिहेरीकरण, चौपदरीकरण, उड्डाणपूल आणि बायपासच्या कामांच्या अंतर्गत या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे.

**वर्षाला १८.३५ दशलक्ष टन मालवाहतूक**

दुपदरीकरणामुळे या मार्गावर वर्षाला अतिरिक्त १८.३५ दशलक्ष टन मालवाहतूक हाताळता येणार आहे. सध्याच्या एकेरी मार्गामुळे मालगाड्यांना अनेकदा अन्य गाड्यांना मार्ग देण्यासाठी थांबावे लागते. दुपदरीकरणानंतर हा खोळंबा कमी होऊन मालवाहतूक अधिक सुरळीत करता येणार आहे. चौक-कर्जत विभागाचे दुपदरीकरण झाल्यानंतर पनवेल-कर्जत मार्गाची एकूण वाहतूक क्षमता वाढणार आहे. प्रवासी आणि मालगाड्यांसाठी अतिरिक्त मार्ग उपलब्ध झाल्याने या महत्त्वाच्या मार्गावरील रेल्वे पायाभूत सुविधा अधिक सक्षम होतील.



**जाहिर नोटिस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री. भिका दुंदा तूपे यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे - चिंचवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.-पै |
|---|---|---|---|
| १६ | १/ड | ००.०७.८० पो.ख. ०२.३०.०० | ०.६० |
| २६ | ११/ब | ००.०४.०० पो.ख.०.००.०० | ०.०५ |
| २६ | ७/अ | ००.१२.०० पो.ख.०.००.०० | ०.१५ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : २१/०९/२०२६

**ॲड. मोनाली रामदास हजारे.**
पत्ता: दहिवली, ए. व्हि. एफ. रेसिडेन्सी, ललानी रोड कर्जत, ता. कर्जत, रायगड.
मो.नं: ९२६०१०९२८२.

**Public Notice**

The public in general is hereby informed that, Mr. Rushank Vyomesh Shah is negotiating to sell to my client property situated at village Navandhe, Tal- Khalapur, Dist-Raigad 410203 bearing Survey numbers are as follows:-

| Survey no | Area (H.R.) | Assessment |
|---|---|---|
| 176/1 | 0-72-00 | 0.39 |
| 176/7 | 0-11-00 | 0.06 |
| 176/10 | 0-03-00 | 0.03 |

Mr. Rushank Vyomesh Shah claims that he is the present owner of the said property.

Any person(s), financial institutions, corporate bodies etc., having any rights, title, claim or interest whatsoever nature in and over the above referred property, by way of sale, inheritance, possession, succession, mortgage, lien, lease, gift or otherwise in respect of the same, shall intimate the objection in writing to the undersigned with supporting document(s) thereof within 07 days (seven days) from the date of publication of this notice or else any such claims by anyone shall not be considered and shall be deemed to have been waived and/or abandoned. And, my client shall proceed to conclude the negotiations and no claims shall be entertained thereafter.

Date:- 21/09/2026
Place: Khopoli

Sd/-
**Adv. Tanishka T. Deshmukh**
Address:- Aashiyana estate, building no 03, block no 101, Veena Nagar, Khopoli, Tal-Khalapur, Dist- Raigad, 410203Telephone No:- 8550945159

**Public Notice**

The public in general is hereby informed that, Mr. Rushank Vyomesh Shah is negotiating to sell to my client property situated at village Shivgaon, Tal- Khalapur, Dist-Raigad 410202 bearing Survey numbers are as follows:-

| Survey no | Area (H.R.) | Assessment |
|---|---|---|
| 54 | 0-01-00 | 0.02 |
| 32 | 0-03-00 | 0.03 |
| 74 | 0-05-00 | 0.02 |
| 70 | 0-06-00 | 0.06 |
| 25 | 0-06-00 | 0.03 |
| 31 | 0-07-00 | 0.06 |
| 36 | 0-07-00 | 0.08 |
| 46 | 0-10-00 | 0.06 |
| 03 | 0-12-60 | 0.31 |
| 30 | 0-14-00 | 0.06 |
| 37 | 0-14-00 | 0.16 |
| 39 | 0-33-00 | 0.23 |
| 49 | 0-43-50 | 0.30 |
| 50 | 0-43-00 | 3.16 |
| 75 | 0-53-80 | 4.79 |

Mr. Rushank Vyomesh Shah claims that he is the present owner of the said property.

Any person(s), financial institutions, corporate bodies etc., having any rights, title, claim or interest whatsoever nature in and over the above referred property, by way of sale, inheritance, possession, succession, mortgage, lien, lease, gift or otherwise in respect of the same, shall intimate the objection in writing to the undersigned with supporting document(s) thereof within 07 days (seven days) from the date of publication of this notice or else any such claims by anyone shall not be considered and shall be deemed to have been waived and/or abandoned. And, my client shall proceed to conclude the negotiations and no claims shall be entertained thereafter.

Date:- 21/09/2026
Place: Khopoli

Sd/-
**Adv. Tanishka T. Deshmukh**
Address:- Aashiyana estate, building no 03, block no 101, Veena Nagar, Khopoli, Tal-Khalapur, Dist- Raigad, 410203.Telephone No:- 8550945159

## महाडमध्ये ‘खाकी’ने घेतले गौराई-गणरायाचे दर्शन!

**| महाड | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवाच्या पाचव्या दिवसाच्या विसर्जनासाठी महाड उपविभागात मोठ्या भक्तिभावाने गणेशभक्त सज्ज झाले असताना, विसर्जन मिरवणुका शांततेत व सुरळीत पार पडाव्यात यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त तैनात केला आहे. कर्तव्यावर तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांकडून कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच भक्तीची भावनाही जपली जात असल्याचे चित्र महाडमध्ये पाहायला मिळाले.



महाड शहर, महाड तालुका, महाड एमआयडीसी आणि पोलादपूर परिसरात मोठ्या संख्येने गणपती व गौरींचे विसर्जन होणार आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच महिला पोलीस कर्मचाऱ्यांची विविध ठिकाणी नियुक्ती करण्यात आली आहे. मिरवणुकांवर लक्ष ठेवत असतानाच महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी काही क्षण वेळ काढून गौराई-गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. कर्तव्याची जबाबदारी आणि गणरायावरील श्रद्धा यांचा हा सुंदर संगम उपस्थितांच्या मनाला भावला.

महाड शहरात ५ सार्वजनिक, १ हजार ३५६ घरगुती गणपती आणि १ हजार ३६१ गौरी, महाड तालुक्यात ८ सार्वजनिक, १ हजार २५३ घरगुती गणपती व २१२ गौरी, महाड एमआयडीसी परिसरात ९ सार्वजनिक, ६७० घरगुती गणपती व २५० गौरी, तर पोलादपूरमध्ये ४ सार्वजनिक, १ हजार ३०१ घरगुती गणपती व ५३० गौरींचे विसर्जन होणार आहे. उपविभागात एकूण २६ सार्वजनिक गणपती, ४ हजार ५८० घरगुती गणपती आणि २ हजार ३५३ गौरींचे विसर्जन होणार आहे. या पार्श्वभूमीवर विसर्जन घाट, मिरवणूक मार्ग, गर्दीची ठिकाणे आणि संवेदनशील भागात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. गणेशभक्तांच्या उत्साहाला सुरक्षिततेची जोड देत पोलीस कर्मचारी अहोरात्र कर्तव्य बजावत आहेत.

## बेकरेवाडीत विहिरीत विसर्जन



**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरानच्या पायथ्याशी वसलेल्या बेकरेवाडी या आदिवासी वाडीत यंदाही गणरायाला पारंपरिक पद्धतीने भावपूर्ण निरोप देण्यात आला. अनेक वर्षांपासून येथे असलेली विहिरीत बाप्पांचे विसर्जन करण्याची सुरू असलेली अनोखी परंपरा यावर्षीही कायम ठेवण्यात आली. गावातील तरुण मंडळी यांनी एकत्र येत मोठ्या उत्साहात नाचत-गाजत गणरायाची मिरवणूक काढत पारंपरिक विहिरीमध्ये गणेशमूर्तीचे विसर्जन केले.

बेकरेवाडीमध्येगणेशोत्सवाला विशेष महत्त्व असून विसर्जनाचे दिवशी संपूर्ण गाव एकत्र येत गणरायाला निरोप देण्याची तयारी करतो.येथे असलेले बाप्पा यांचे येथील पाण्याने भरलेल्या विहिरीत विसर्जन करण्याची अनेक वर्षांची परंपरा आहे. बेकरेवाडीतील गणेश विसर्जनाची पद्धत इतर ठिकाणांपेक्षा वेगळी आणि पारंपरिक स्वरूपाची आहे. गावातील एका विहिरीमध्ये गणरायाचे विसर्जन करण्याची अनेक वर्षांची परंपरा आजही जपली जात आहे. या परंपरेनुसार गणेशमूर्ती विहिरीजवळ आणल्यानंतर गावातील तरुण मंडळी विशेष पद्धतीने मूर्ती खांद्यावर उचलून विहिरीच्या ठिकाणी घेऊन जातात.

विहिरी जवळ पोहचल्यावर पारंपरिक पद्धतीने गणेशमूर्ती विहिरीमध्ये खाली नेण्यात येते आणि विधिवत गणरायाचे विसर्जन केले जाते. या वाडीमधील तरुणाईने जपली गावाची परंपरा जपली असून बदलत्या काळात गणेश विसर्जनाच्या पद्धतीत अनेक बदल होत आहेत.पण बेकरेवाडीतील ग्रामस्थांनी मात्र आपल्या पूर्वजांपासून चालत आलेली ही परंपरा आजही जपली आहे. विशेष म्हणजे गावातील तरुण पिढी या परंपरेत उत्साहाने सहभागी होत असल्याने ही परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

**श्रद्धा आणि संस्कृतीचा अनोखा संगम**

बेकरेवाडीतील गणेश विसर्जन सोहळा हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून गावाच्या सांस्कृतिक आणि पारंपरिक जीवनशैलीचे दर्शन घडवणारा सोहळा ठरतो. अनेक वर्षांपासून सुरू असलेली विहिरीमध्ये गणेशमूर्ती विसर्जित करण्याची पद्धत श्रद्धेचा विषय आहे.

## खांब विभागात गणरायांचे विसर्जन



**| खांब | प्रतिनिधी |**

गणेश चतुर्थीच्या दिवशी मोठ्या भक्तिमय वातावरणात घरोघरी आगमन झालेल्या गणरायांचे सातव्या दिवशी विसर्जन करण्यात आले.

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या अशाप्रकारचा जयघोष करीत खांब विभागातील तमाम गणेशभक्तानी आपल्या लाडक्या बाप्पांना भक्तीमय वातावरणात निरोप दिला.गणेश चतुर्थीला मोठ्या आनंददायी वातावरणात गणरायाची घरोघरी स्थापना केल्यानंतर दररोज मनोभावे पूजन, भजन, आरती, हरिपाठ, किर्तन, जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रमाबरोबरच पुरूषांचे कलगीतुरा नाच व छब्बो डान्स तर महिला वर्गाने झिम्मा फुगडी, मंगळागौर, फेर धरून नाचणे आदी करमणूक व मनोरंजनाचे कार्यक्रमही घरोघरी करण्यात आले.

पाच दिवसांचे विश्रांतीनंतर विसर्जनाचे सहाव्या दिवशी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात घरोघरी व सार्वजनिक ठिकाणी विराजमान झालेल्या बाप्पांना निरोप देण्यात आला. विसर्जन मिरवणुकीत टाळ मृदंग वाजवित तसेच नाचगाणे करून व स्पिकरवर लावलेल्या विविध स्वरूपातील गाणी लावून सार्वजनिक तलाव, नद्या आदी ठिकाणी गणरायांचे विसर्जन करण्यात आले. यावेळी विसर्जन मिरवणुकीच्या दरम्यान पावसाने जरी हजेरी लावली होती.

## गणेश विसर्जनानंतर निर्माल्य संकलन

**| कोलाड | प्रतिनिधी |**

पुगांव गावातील तलावावर गौरी-गणपतींचे भक्तिमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. ग्रामस्थांना तलावातील पाणी दूषित होऊ नये, यासाठी निर्माल्य पाण्यात न टाकण्याचे आवाहन करण्यात आले होते. विसर्जनानंतर तलावातील पाण्यात फुले, हार, वेणी, कंठी तसेच प्लास्टिकच्या पिशव्या व इतर निर्माल्य आढळून आले. त्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन आणि तलावाचे पाणी स्वच्छ ठेवण्याच्या उद्देशाने नारायण येळकर, समीर धुपकर, हरेश धुपकर तसेच ग्रामस्थांनी पुढाकार घेत तलावातील निर्माल्य बाहेर काढले.

## रक्तदान शिबीर संपन्न

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील साखरणे गावामध्ये गणेशोत्सवाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते,

ग्रामीण भागातील गरजवंतांना वेळेवर रक्तपुरवठा व्हावा आणि वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगात कोणाचाही जीव धोक्यात येऊ नये, या सामाजिक बांधिलकीतून युनिटी ग्रुप आणि शौर्य प्रतिष्ठान कोकण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर अत्यंत उत्साहात संपन्न झाले. या शिबिराला साखरोणे आणि आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांचा व तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



थेंब थेंब रक्ताचा... जीवनाला नवा श्वास आणि रक्तदान - जीवन दान हे सूत्र उराशी बाळगून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अपघात, गंभीर आजार किंवा शस्त्रक्रियेदरम्यान रक्ताच्या कमतरतेमुळे संकट येऊ नये, या हेतूने हे शिबिर राबवण्यात आले.

## लोककलेसह सांस्कृतिक परंपरेचे जतन करणे आवश्यक

### सामाजिक कार्यकर्ते मनोहर बैले यांचे प्रतिपादन

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

पारंपरिक लोककला आणि सांस्कृतिक परंपरा ही आपल्या समाजाची ओळख असून, तिचे जतन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते तथा कोळी समाज नवापाडा माजी अध्यक्ष मनोहर बैले यांनी मुरूड कोळीवाड्यातील हिराबाई मनोहर बैले यांच्या निवासस्थानी श्री गणेशोत्सवानिमित्त आयोजित झाकरी नृत्य सादरीकरणाच्या कार्यक्रमावेळी ते बोलत होते.



यावेळी श्री बाळ गणेश राजपुरी नाच मंडळाच्या १२ जणांच्या महिला कलाकारांच्या समूहाने आकर्षक झाकरी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमात शायर मुरलीधर घागरी यांनी आपल्या दमदार सादरीकरणातून कार्यक्रमाची रंगत वाढवली. तसेच वसतात निधी आगरकर यांच्या सह अनेक मुलीनी सहभाग घेतला. पारंपरिक झाकरी नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. कलाकारांनी पारंपरिक वेशभूषेत नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. मनोहर बैले पुढे म्हणाले की, आधुनिकतेच्या काळात पारंपरिक लोककला, लोकनृत्य आणि सांस्कृतिक प्रथा हळूहळू लोप पावत आहेत. या कला पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन होणे गरजेचे आहे. तरुण पिढीनेही आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची जपणूक करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला समाजबांधव, महिला, युवक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या पारंपरिक कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या आदेशाची अंमलबजावणी | पाली पोलिसांनी केली प्रभावी जनजागृती**

# सुधागड तालुक्यात गणेश विसर्जन डीजेमुक्त!

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यात यंदाचा गणेश विसर्जन सोहळा डीजेमुक्त आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनिप्रदूषण तसेच लेझर लाईटच्या वापराबाबत प्रशासनाने घेतलेल्या भूमिकेला गणेश मंडळे आणि नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्यामुळे गणेशोत्सवाचा उत्साह कायम ठेवतानाच ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्याचा सकारात्मक संदेश सुधागड तालुक्यातून देण्यात आला.



जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या आदेशाची अंमलबजावणी करत रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पाली पोलिसांनी गणेश मंडळे तसेच नागरिकांमध्ये प्रभावी जनजागृती केली. पाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध गणेश मंडळांशी संपर्क साधून ध्वनिप्रदूषण आणि लेझर लाईटच्या वापराबाबतच्या नियमांची माहिती दिली. पोलिसांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत पाच दिवसांच्या गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये डीजेचा वापर टाळण्यात आला. डीजेच्या कर्णकर्कश आवाजाऐवजी पारंपरिक ढोल-ताशांचा गजर, गणपती बाप्पा मोरयाचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणात गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. उत्सवाचा जल्लोष कायम ठेवतानाच ध्वनिप्रदूषणाबाबतची सामाजिक जबाबदारीही गणेश मंडळांनी जपल्याचे यानिमित्ताने दिसून आले.उत्सवही साजरा करूया आणि पर्यावरणाचीही काळजी घेऊया हा सकारात्मक संदेश या उपक्रमातून पुढे आला. प्रशासन, पोलीस यंत्रणा, गणेश मंडळे आणि नागरिक यांच्या समन्वयातून पार पडलेला हा उपक्रम आगामी सार्वजनिक उत्सवांसाठी परिवर्तनाकडे एक पाऊल ठरणारा आहे.

या उपक्रमाला सहकार्य करणाऱ्या सर्व गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचे पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांनी आभार व्यक्त केले. नागरिकांच्या सहकार्यामुळे गणेश विसर्जन सोहळा शांततापूर्ण, शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पाडणे शक्य झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# गणेश दर्शन स्पर्धा २०२६



●अष्टगंध कला मंचाचे अध्यक्ष अशोक कान्हा म्हात्रे यांच्या बेलपाडा येथील निवासस्थानात विराजमान गणपती बाप्पा. (छायाचित्र- अशोक म्हात्रे)



● उदय रामदास घरत, वरसोली येथील निवासस्थानात विराजमान गणपती बाप्पा.



● मु. मुशेत, ता. अलिबाग येथील श्री. संदेश करजुकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीची मूर्ती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● नेरळ-दहिवली येथे मनोज सदाशिव भवारे आणि जितेंद्र सदाशिव भवारे यांच्या घरी अत्यंत सुरेख आणि मनमोहक देखावा साकारण्यात आला आहे. भव्य गुहेच्या (Cave Theme) पार्श्वभूमीवर बाप्पाची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.नैसर्गिक गुहेसारखा भास निर्माण करणारी ही सजावट आणि त्यावर केलेली आकर्षक प्रकाशयोजना (Lighting) पाहणाऱ्यांचे मन वेधून घेत आहे. गुहेच्या मध्यभागी विराजमान झालेले श्रीगणेशाचे रूप अत्यंत सतेज आणि देखणे दिसत आहे. (छायाचित्र : कांता हाबळे)



● मुरुड कोळीवाडा येथील जितेंद्र मकू कुटूंबियांनी आपल्या घरी शिवरायांचे निष्ठावंता शिलेदार असा वैशिष्टपूर्ण संकल्पनेवर आधारित देखावा व श्री गणेशमूर्ती (छायाचित्र : सौरभ नाझरे)



●मुरुड कोळीवाडा येथील प्रयाग अनंत केंडू यांच्या निवासस्थानी श्री गणेशमूर्ती. (छायाचित्र : सौरभ नाझरे)



● मुरुड-डोंगरी येथील अजिंक्य शेळके यांचे आईचं घर निवासस्थानी विराजमान श्री गणेशमूर्ती. (छायाचित्र : सौरभ नाझरे)



●उरणच्या कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा बालाजी गायकवाड यांच्या नवी मुंबई वाशी येथील सागर को.हाउसिंग सोसायटी सेक्टर २९ येथील निवासस्थानात विराजमान गणपती बाप्पा. (छायाचित्र- मनश्री गायकवाड)



●माणगाव नगरपंचायत हद्दीतील दत्तनगर येथील रहिवासी तथा सामाजिक कार्यकर्ते संदीप नागे यांच्या निवासस्थानी कुटुंबातील सदस्यांनी अथक परिश्रम घेत पर्यावरणपूरक असा रामसेतू बांधणी गणेशोत्सव देखावा आकर्षकपणे साकारला असून हा देखावा पाहण्यासाठी गणेशभक्तांची गर्दी होत आहे. (छायाचित्र : सलीम शेख)



● मु. चोरोंडे, ता. अलिबाग येथील श्री. हेमंत रामचंद्र नेमन यांच्या घरी विराजमान गणरायाची आकर्षक मूर्ती,



● मु. मापगाव, ता. अलिबाग, काठे कुटुंबातील मनमोहक श्रींची मूर्ती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● मु. मुनवली, ता. अलिबाग येथील श्री. अशोक मसुरकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची मूर्ती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● मु. मुनवली, ता. अलिबाग येथील श्री. दिलिप मोंढे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची मूर्ती. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



● मु. मुनवली, ता. अलिबाग येथील श्री. मधुकर सूद यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची मूर्ती. (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● मु. मुनवली, ता. अलिबाग येथील श्री. संजय अनमाने यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची मूर्ती, (छायाचित्र : अब्दुल सोगावकर)



● श्री. तेजस पाटील, मु. तुडाळ, ता. अलिबाग, यांच्या घरी पहिल्यांदाच विराजमान झालेल्या गणपतीचे दर्शन घेताना किहीम सरपंच पिंट्या गायकवाड व इतर. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)

# भारताला नेमबाजीत दोन रौप्य

- आशियाई क्रीडा स्पर्धेत चांगली सुरुवात
- एलावेनिल वलारिवान हिचा मोठा वाटा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची सुरुवात चांगली झाली आहे. रविवारी (दि.२०) भारताला नेमबाजीत दोन रौप्यपदके मिळाली असून, एमएमए या क्रीडा प्रकारातही भारताचे पदक सुचिका तरियालने पक्के केले आहे. नेमबाजीतील यशात एलावेनिल वलारिवान हिचा मोठा वाटा राहिला असून, तिने सांघिक आणि वैयक्तिक प्रकारात पदके जिंकली आहेत.

एलावेनिल वलारिवान हिने महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात वैयक्तिक रौप्यपदक जिंकले आहे. तिने २५२.४ गुणांसह हे पदक जिंकले असून, तिचे सुवर्णपदक अगदीच थोड्या फरकाने हुकले. ती शेवटपर्यंत सुवर्णपदकाच्या शर्यतीत होती. परंतु, केवळ ०.३ गुणांने तिचे सुवर्णपदक हुकले. यावेळी सुवर्णपदक जिंकणाऱ्या जपानच्या हिनाका तैची हिने २५३ गुण मिळवले होते. तसेच, हा नवा आशियाई विक्रमही ठरला आहे. तर, दक्षिण कोरियाच्या ह्योजिन बॅन हिने २३० गुणांसह कांस्यपदक नावावर केले आहे.

दरम्यान, एलावेनिल वलारिवान हिने वैयक्तिक रौप्यपदक जिंकण्यापूर्वी सोनम मस्कर आणि विदर्सा विनोद यांच्यासह महिलांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारातही रौप्यपदक जिंकले होते. या तिघींनी मिळून १८९८.० गुणांसह हे रौप्यपदक नावावर केले. या प्रकारात चीनने सुवर्णपदक जिंकले. तसेच, सांघिक प्रकारात एलावेनिल वलारिवान हिने ६३३.५ गुण मिळवत भारताच्या संघात सर्वोत्तम कामगिरी केली होती. त्यानुसार ती वैयक्तिक प्रकारासाठी पात्र ठरली. याशिवाय सोनमने देखील वैयक्तिक प्रकारासाठी पात्रता मिळवली होती. परंतु, ती अंतिम फेरीत ६ व्या क्रमांकावर राहिली. त्यामुळे नेमबाजीत भारताची सुरुवात दमदार झाली असून, अजूनही बऱ्याच पदकांची अपेक्षा भारताला आहे. यापूर्वी २०२३ च्या आशियाई स्पर्धेत भारताने ७ सुवर्ण, ९ रौप्य आणि ६ कांस्य असे मिळून २२ पदके नेमबाजीत मिळवली होती. त्यामुळे यंदा यापेक्षाही चांगल्या कामगिरीची अपेक्षा नेमबाजांकडून आहे.

## सुचिका तरियालचे ऐतिहासिक पदक

सुचिका तरियाल ही रविवारी महिलांच्या पारंपरिक एमएमए ६० किलो वजनी गटाच्या स्पर्धेत उपांत्य फेरीत पोहचली आहे. त्यामुळे तिने भारताचे पदक पक्के केले आहे. ती जर उपांत्य फेरी जिंकली, तर सुवर्णपदकासाठी खेळेल. मात्र, पराभूत झाली, तरी तिला कांस्यपदक मिळेल. त्यामुळे ती आशियाई क्रीडा स्पर्धेत एमएमए प्रकारात पदक मिळणारी भारताची पहिलीच खेळाडू ठरली आहे. तिने उपांत्यपूर्व फेरीत मंगोलियाच्या अल्तानचिमग बैगालमा हिला पराभूत करत उपांत्य फेरीत धडक मारली आणि भारतासाठी ऐतिहासिक पदक पक्के केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)